दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८८ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शनिवार, ६ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## ठाकरे गटाने टाकला वेगळाच पत्ता
### आता रंगणार कल्याण लोकसभेचा डाव





**■ठाणे, विशाल कारंडे,**

कल्याण लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार म्हणून श्रीकांत यांचेच नाव चर्चिले जात आहे. शिंदे यांना प्रतिस्पर्धी म्हणून तगडा उमेदवारास येथे ठाकरे गटाकडून उमेदवारी दिली जाऊ शकते अशी अटकळबांधली जात होती. त्यासाठी आदित्य ठाकरे यांच्यानावा पासून ते सुषमा अंधारे, वरुण सरदेसाई, केदार दिघे यांसोबतच सुभाष भोईर यांच्या नावाची चर्चा होती. ठाकरे गटाने यातील एक पत्ता टाकल्यास कशी लढत द्यायची याची पूर्ण तयारी शिंदे गटाच्या सोशल मिडीयाने केली होती. मात्र ठाकरे गटाने वेगळाच पत्ता उघड करत वैशाली दरेकर यांच्या नावाची घोषणा करत सामान्य चेहऱ्याला संधी देऊ केली आहे. या नावाने शिंदे गट देखील आश्चर्यचकीत झाला असून ठाकरे गटाने निवडणूक रिंगणात टाकलेला हा पत्ता खरा की खोटा, ठाकरे गट पुढे काय वेगळा डाव टाकतो का याची देखील चाचपणी शिंदे गटाकडून केली जात असल्याची जोरदार चर्चा कालपासून शहरात रंगली आहे. ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदारसंघ हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेचा मुद्दा बनला आहे. शिवसेनेत फूट पडल्यानंतर सोबत आलेल्या आमदारांना तिकीट मिळवून देत त्यांना आपल्यासोबत कायम ठेवण्यासोबतच आपल्याच बालेकिल्ल्यातील आपले व मुलाचे स्थानही अबाधित राखण्याचा आटापिटा शिंदे यांच्या कडून सध्या सुरू आहे.

यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कल्याण लोकसभेत वैशाली दरेकर यांच्या नावाची घोषणा केली. त्यांच्या नावाने महिला उमेदवार, एक सुशिक्षित, उत्तम श्रोता व सामान्य स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार ठाकरे गटाने दिल्याचा प्रचार केला जात आहे. दरेकर यांना उमेदवारी दिल्याने ठाकरे गटातील पदाधिकाऱ्यांत तसेच इतर इच्छुक उमेदवारांत नाराजी असल्याचे बोलले जात आहे. मात्र यावर सध्या उघडपण बोलण्यास कोणी तयार नाहीत. सामान्य चेहरा असला तरी फाजील आत्मविश्वास न बाळगता ठाकरे गटाच्या या नवख्या पत्याला सामोरे जायची तयारी शिंदे गटाने सुरु केल्याची चर्चा आहे. तर दुसरीकडे ठाकरे गटाने टाकलेला हा पत्ता खरा की खोटा ऐन वेळेला ठाकरे गट आपला पत्ता चेंज करत खासदार शिंदे यांच्यासमोर एक वेगळेच आव्हान निर्माण करतील असे जाणकारांचे मत आहे. आता ठाकरे गट याच पत्त्यावर आपला डाव रंगवते की पत्ता फिरवत शिंदे गटासमोर वेगवेगळी आव्हान निर्माण करते हे पहावे लागेल.

> याठिकाणी भाजपकडूनच त्यांची अडचण केली जात असून ठाकरे गट या सर्व गोष्टींचा फायदा उचलू पहात आहेत. खासदार शिंदे यांच्या विरोधात ठाकरे गटाकडून तेवढ्याच ताकदीचा उमेदवार दिला जाईल असे बोलले होते. त्यासाठी आदित्य ठाकरे, वरुण सरदेसाई, सुषमा अंधारे अशा बड्या नेत्यांच्या नावाची चर्चा करण्यात आली. तसेच शिंदे यांच्यावर नाराज असलेले सुभाष भोईर यांचे देखील नाव अग्रस्थानी होते. तसेच केदार दिघे यांच्या नावाची नंतर शक्यता वर्तविली जात होती. आपल्या विरोधात ठाकरे गटाने यापैकी एकास उमेदवारी दिली तर आपण निवडणूकीच्या रिंगणात त्यांना कसे सामोरे जायचे याची तयारी शिंदे गटाकडून करण्यात आली होती. ठाकरे गटाकडून देखील येथे कोणता उमेदवार द्यायचा याचा अभ्यास सुरु होता. गणपत गायकवाड यांच्या पत्नी सुलभा गायकवाड यांच्या नावाचा विचार ठाकरे गटाने केला होता. तसेच सुभाष भोईर यांच्या नावावर जवळपास शिक्कामोर्तब होत असताना खुद्द भोईर यांनी या निवडणूकीतून माघार घेतल्याची माहिती ठाकरे गोटातून आली आहे.

## संजय निरुपम यांची काँग्रेसमधून हकालपट्टी



**■मुंबई, यश सावंत :,**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते संजय निरुपम यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आलं आहे. पण संजय निरुपम यांनी केलेल्या दाव्यानुसार, त्यांनी आधीच राजीनामा दिला होता. याबाबतची माहिती त्यांनी ट्विटरवर दिली आहे. पक्षाविरोधात भाष्य केल्याने संजय निरुपम यांना पक्षाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. लोकसभेसाठीच्या स्टार प्रचारकांच्या यादीतून बुधवारी सायंकाळी निरुपम यांना वगळण्यात आल्यानंतरच त्यांना निलंबित केलं जाणार अशी शक्यता व्यक्त केली जात होती. बुधवारी सायंकाळी राज्यातील काँग्रेस कमिटीकडून निरुपम यांना निलंबित करण्यासाठीचा प्रस्ताव दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांकडे पाठवण्यात आला. निरुपम यांनी काँग्रेसच्या 'इंडिया' आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाबद्दल आणि गटाचे नेते उद्धव ठाकरेंबद्दल वादग्रस्त विधानं केली होती. लोकसभेसाठी ठाकरे गटाने वायव्य मुंबईच्या जागेवर उमेदवार जाहीर केल्यानंतर निरुपम यांनी प्रसारमाध्यमांसमोर उघडपणे नाराजी व्यक्त केली. त्यापूर्वी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेसंदर्भात विधान केलं होतं.

काँग्रेसचे सचिव के. सी. वेणूगोपाल यांच्या स्वाक्षरीसहीत जारी करण्यात आलेल्या पत्रामध्ये, ''बेशिस्त आणि पक्षविरोधी वक्तव्यासंदर्भातील तक्रारींची दखल घेत काँग्रेस अध्यक्षांनी श्री संजय निरुपम यांची पक्षातून 6 वर्षांसाठी तत्काळप्रभावाने हकालपट्टी करण्यास मान्यता दिली आहे,'' असं नमूद केलं आहे. स्टार प्रचारकांच्या यादीमधून निरुपण यांना काढल्यानंतर त्यांनी काँग्रेसवर टीका केली होती. तसेच आपण आपली पुढील भूमिका उद्या मांडू असं निरुपम यांनी म्हटलं होतं.

महाविकास आघाडीमधील मित्र पक्ष असलेल्या ठाकरे गटाने १६ उमेदवारांची यादी जाहीर केली. २७ मार्च रोजी ही यादी जाहीर झाल्यानंतर निरुपम यांनी ठाकरे गटावर टीका केलेली. या यादीमध्ये अमोल किर्तीकर यांचाही समावेश असल्याच्या मुद्द्यावरुन निरुपम यांनी असहकाराची भूमिका घेतली. तसेच त्यांनी किर्तिकर यांना पाठिंबा देणार नाही असं सांगताना 'खिचडी घोटाळा' करणाऱ्यांना समर्थन करणार नाही असंही म्हटलेलं. ''ज्या पद्धतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मुंबईत पाच जागा देण्यात आल्या आहेत ते पाहता हा काँग्रेसला मुंबईतून संपवण्याचा प्लॅन वाटतो. असं वाटतंय की शिवसेनेनं काँग्रेसला गुडघ्यावर आणलं,'' अशी प्रतिक्रिया निरुपम यांनी नोंदवली होती.

''काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी मध्यस्थी करुन शिवसेना ठाकरे गटाबरोबरची युती तोडावी. शिवसेनेला वाटत असेल की ते एकटे लढू शकतात तर ही त्यांची मोठी चूक आहे,'' असंही निरुपम म्हणाले. निरुपम यांनी उद्धव ठाकरेंचा उल्लेख 'उरल्या सुरलेल्या शिवसेनेचे प्रमुख' असा केला होता. याच मुद्द्यांवरुन आता त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

## मतदानासाठी कामाच्या वेळेत बदल करण्याची किंवा सुट्टी देण्याची मुभा



**■नाशिक, प्रतिनिधी,**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ राज्यात पाच टप्प्यात होणार आहे. पाचव्या टप्प्यात नाशिक जिल्ह्यातील २० दिंडोरी आणि २१ नाशिक लोकसभा जागांवर २० मे रोजी मतदान होणार आहे. त्यानुसार, मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी काही ठिकाणी सुट्टी किंवा कामाच्या तासांमध्ये बदल करण्यात आले आहेत. मतदारांनी सुट्टी व सवलतींचा लाभ घेऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जलज शर्मा यांनी केले आहे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम १३५ (बी) मध्ये मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी ठराविक ठिकाणी कामाच्या वेळेत बदल किंवा सुट्टी देण्याची तरतूद आहे. शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खाण विभागाच्या २२ मार्च २०२३ च्या परिपत्रकानुसार, पुढील आदेश जारी करण्यात आले आहेत.मतदान मतदारसंघातील मतदार असलेले कामगार अधिकारी/कर्मचारी, जरी ते मतदान मतदारसंघाबाहेर काम करत असले तरी, त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी थोडा वेगळा वेळ दिला जाईल. मतदानाच्या दिवशी दिलेली सुट्टी सर्व औद्योगिक गट, महामंडळे, कंपन्या आणि संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा उद्योग विभागाच्या अंतर्गत असलेल्या इतर आस्थापनांना लागू असेल. अपवादात्मक परिस्थितीत, कर्मचारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांना संपूर्ण दिवसाची रजा देणे शक्य नसल्यास मतदान क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी रजेच्या बदल्यात किमान दोन तासांची सूट दिली जाऊ शकते. यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील. या परिपत्रकानुसार, उद्योग विभागाच्या अखत्यारीतील सर्व औद्योगिक समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम इत्यादींनी परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन होत असल्याची खात्री करावी. योग्य रजा किंवा मतदानासाठी सवलत न मिळाल्याने मतदारांना मतदान करता आले नाही, अशी तक्रार आल्यास संबंधित व्यक्तीवर कारवाई करण्यात येईल, असे या परिपत्रकात म्हटले आहे.

## सासवड ईव्हीएम चोरी प्रकरणातील तिन्ही अधिकाऱ्यांचे निलंबन रद्द, मॅटचे राज्य सरकारला आदेश



**■पुणे, अभिजीत येरुल्लू,**

सासवड येथील तहसीलदार कार्यालयात मतदानाच्या प्रचार व प्रसारासाठी देण्यात आलेल्या ईव्हीएम चोरी झाल्याप्रकरणी पुरंदर उपविभागीय अधिकाऱ्यांसह उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच पुरंदरचे तहसीलदार या तिघांचे निलंबन रद्द करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाने (मॅट) राज्य सरकारला आदेश दिले आहेत.

या तिघांनाही त्यांच्या मूळ ठिकाणी नियुक्ती देण्याचे आदेशात नमूद केले आहे. पुरंदर तहसील कार्यालयातील स्ट्राँग रूममध्ये जनजागृतीसाठी ठेवलेल्या ईव्हीएम मशीनमधून एक कंट्रोल युनिट चोरीला गेल्याचा प्रकार फेब्रुवारीत घडला होता. या दिवशी रविवारी सुटीमुळे तहसील कार्यालय बंद होते. सोमवारी स्ट्राँग रूमचा दरवाजा उघडलेला दिसून आला. त्यावरून स्ट्राँग रूममधील प्रात्यक्षिक मशीनची चोरी झाल्याचे उघडकीस आले. त्यावेळी सहायक फौजदार डी. एल. माने आणि होमगार्ड राहुल जरांडे कर्तव्यावर होते.

या घटनेनंतर त्यांना निलंबित करण्यात आले. त्यानंतर या प्रकरणाची गंभीर दखल केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतली. आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत पुरंदरचे प्रांताधिकारी वर्षा लांडगे- खत्री, तहसीलदार विक्रम रजपूत तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी तानाजी बर्डे यांना निलंबित करण्याचे आदेश सरकारला दिले होते. याबाबत विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांची चौकशी समितीही स्थापन करण्यात आली होती. या आदेशाविरोधात लांडगे, बर्डे तसेच राजपूत यांनी मॅटमध्ये याचिका दाखल केली होती.

'स्ट्राँग रूममध्ये झालेल्या चोरीप्रकरणी या तिघांचा कोणताही हलगर्जीपणा आढळून आला नाही. तसेच त्यांचा त्यात दोषही नाही. त्यामुळे आमची चूक नसताना आम्हाला निलंबन करणे योग्य नाही. त्यामुळे आमचे निलंबन रद्द करण्यात यावे,' अशी विनंती याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. पूनम महाजन यांनी केली होती. त्यावेळी राज्य सरकार तसेच निवडणूक आयोगाला उत्तर देता आले नाही. त्यामुळे महाजन यांच युक्तिवाद मान्य करून मॅटचे सदस्य न्या. व्ही. के. जाधव यांनी ग्राह्य धरून निलंबन रद्द करण्याचे सरकारला आदेश दिले.

तसेच त्या तिघांची अनुक्रमे पुरंदरच्या प्रांताधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच तहसीलदारपदी नियुक्ती करण्याचे आदेशही त्यांनी सरकारला दिले आहेत. त्यामुळे या तिघांना दिलासा मिळाला आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी कल्याणची गुढी

**■कल्याण,नितीन देवळेकर,**

कल्याण शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ घराण्यातील एका महिलेने आपल्या गुढी तयार करण्याच्या व्यवसायातील एक पर्यावरणपूरक देखणी गुढी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नवी दिल्ली येथील त्यांच्या घरी चैत्र पाडव्याच्या दिवशी उभारण्यासाठी पाठविली आहे. अयोध्येत राम मंदिराची उभारणी आणि संस्कृती संवर्धनासाठी पंतप्रधान मोदी यांच्याकडून सुरू असलेल्या प्रयत्नांतून आपण आदरभावाने ही गुढी पंतप्रधानांना खासगी टपालाने पाठविली आहे, अशी माहिती या गुढी व्यवसायातील मुख्य प्रवर्तक मेधा मोहन आघारकर यांनी दिली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार याशिवाय अनेक मान्यवरांना आपण पर्यावरणपूरक गुढ्या पाठविल्या आहेत, असे मेधा आघारकर यांनी सांगितले. सध्याच्या धकाधकीत, नोकरी, व्यवसायाच्या व्यापात अनेकांना चैत्र पाडव्याच्या दिवशी घराच्या दारासमोर बांबू आणून गुढी उभारणे शक्य होत नाही. आताच्या नवतरूण पीढीला गुढी उभारण्याचे महत्व, त्यामधून होणारे आपल्या संस्कृती रक्षणाचे कार्य याविषयी माहिती मिळावी. आपली हिंदू संस्कृतीची हजारो वर्षाची



गुढीची परंपरा पुढे चालू राहावी म्हणून मेधा यांनी पंधरा वर्षापूर्वी घर बसल्या कागद, कपड्याच्या पर्यावरणपूरक गुढी बनविण्यास सुरूवात केली. सुरूवातीला दोन ते तीन महिलांच्या साहाय्याने तयार करण्यात येणाऱ्या या गुढी तयार करण्यासाठी मेधा यांच्याकडे आता १५ महिला काम करतात. रोजगाराचे एक साधन या निमित्ताने तयार झाले आहे. केवळ व्यापारी उद्देशातून या गुढ्या आपण तयार करत नाहीत तर, आपल्या संस्कृतीची परंपरा पुढे जावी या दूरगामी विचारातून आपण या गुढ्या तयार करत आहोत, असे मेधा यांनी सांगितले.

या गुढ्या तयार करणाऱ्या महिला त्यांच्या ओळखीतील लोकांना या पर्यावरणपूरक गुढ्या विकतात. त्यामधून त्यांची मजुरी निघते. डिसेंबरपासून या कामाला सुरूवात केली जाते. दोन हजार छोट्या आकाराच्या गुढ्या तयार केल्या जातात. मुंबई उच्च न्यायालयातील एका महिला न्यायमूर्तींनी या पर्यावरणपूरक गुढीचे कौतुक करून आपला सन्मान केला होता. माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी बाजपेयी यांना या गुढीचे आकर्षण होते. त्यांनी त्यांच्या कालावधीत एक हजाराहून अधिक पर्यावरणपूरक गुढ्यांची मागणी केली होती. वीर मणी हे उद्योजक आपल्या दुकानासमोर दरवर्षी आपली पर्यावरणपूरक गुढी उभारतात. घरगुती पध्दतीने आपण हा व्यवसाय छंद म्हणून करतो. करोना काळात आपली सून आणि आपण या गुढ्या करून सोसायटीच्या प्रवेशव्दारात जाऊन इच्छुकांना दिल्या होत्या. पाच वर्षाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अयोध्येत राम मंदिर उभारून भक्तांची मागणी पूर्ण केली. भक्तांच्या मनातील आनंद गुढीच्या रुपाने त्यांच्यापर्यंत पोहचावा. आपली पर्यावरणपूरक गुढी त्यांनी घरात उभारून आनंदोत्सव साजरा करावा, या उद्देशातून आपण यावेळी पंतप्रधान मोदींना पर्यावरणपूरक गुढी पाठविली आहे, असे आघारकर यांनी सांगितले. या उपक्रमाबद्दल उद्योजकता मेळाव्यात, कल्याण भूषण पुरस्काराने आघारकर यांना गौरविण्यात आले आहे.

## ठेकेदार व अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण संगनमताने लागली उत्तनच्या डम्पिंगला आग

**■मीरारोड, दिगंबर जाधव,**

भाईंदरच्या उत्तन येथील डम्पिंगला सातत्याने आगी लागण्या मागे विविध कामांच्या ठेकेदारांचे व अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण संगनमत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे उत्तन पोलीस ठाण्यातील गुन्ह्याचा तपास काटेकोर झाल्यास अनेक घोटाळे बाहेर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मीरा भाईंदर महापालिकेला शासनाकडून उत्तन धावगि येथे घनकचरा प्रकल्प राबवण्यासाठी मोफत जागा मिळाली असताना पालिकेने येथे बेकायदा डम्पिंग ग्राउंडच तयार केले आहे. या ठिकाणी पूर्वीपासून प्रक्रिया न केलेला कचऱ्याचा डोंगर निर्माण झाला आहे. त्याठिकाणी रोजचा येणारा शहरातला सुमारे ४५० ते ५५० टन ओला आणि सुका कचरा वर प्रक्रिया करण्यासाठी एन्वायरो प्रोजेक्ट हा ठेकेदार पालिकेने नेमला आहे. सदर ठेकेदार हा सर्वच कचऱ्यावर प्रक्रिया करत नाही तर काही प्रमाणातील कचऱ्यावरच प्रक्रिया करतोय. शिवाय रोज येणारा कचरापैकी सुमारे ५० टक्के कचरा वर्गीकरण केलेला नसल्याने त्यावर प्रक्रिया करणे अवघड होऊन तेथे रोज कचऱ्याचा डोंगर वाढीला लागलेला आहे. पूर्वीच्या सुमारे १० लाख टन इतक्या साचलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग करायचे म्हणून पालिकेने कोट्यवधींचा ठेका ठेकेदारास दिला आहे. तर रोजचा येणाऱ्या



कचरा सपाटीकरण करण्यासाठीचा वेगळा ठेका गेल्या अनेक वर्षांपासून एकाच ठेकेदारास आंदण असल्यागत आहे. तर आग लागली की काही गावातील ग्रामस्थच पाणी टँकरने पुरवण्याचे काम करत आहेत.

उत्तन डम्पिंगला सतत आग लागून विषारी धूर पसरून तसेच रोजची दुर्गंधी यामुळे लोकांना श्वास घेणे अवघड झाले आहे. नुकत्याच लागलेल्या आगीमुळे परिसरात ऐन धार्मिक उत्सव काळात परिसरात धुराचे साम्राज्य पसरले. त्याचा संताप ग्रामस्थांनी व्यक्त करत शिष्टमंडळाने महापालिका आयुक्तांची भेट घेऊन निवेदन देत डम्पिंग बंद करण्याची मागणी केली .

दरम्यान आग लावण्यात आल्याच्या पालिकेच्या फिर्यादी नंतर उत्तन सागरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्याचा तपास पोलीस करत असतानाच कचऱ्याला आग लावण्यामागे पालिकेचे ठेकेदार व अधिकारी यांच्यातील संगनमत तर कारणीभूत नाही ना? असा प्रश्न केला जात आहे. कारण धावगी येथे कचरा साठवण्यास जागा नसल्याने तसेच रोज येणाऱ्या कचऱ्यासाठी जागा करायची असल्याने लेव्हलिंगचा ठेकेदार काम करतो. तर साचलेल्या कचऱ्याचा डोंगर वर बायोमायनिंग चा ठेकेदार सुद्धा काम करतो. त्यामुळे कचऱ्याला आग लागल्याने ती दोन चार दिवस धुमसत राहून आतापर्यंत मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा हा जाळून गेला आहे. कचरा जळून गेल्याने ठेकेदारांनी त्याचा फायदा होत असल्याचे आरोप होत आहेत. शिवाय आग लागल्यावर टँकरने पाणी पुरवणारे स्थानिक ठेकेदार यांचा सुद्धा आर्थिक फायदा होत असतो.

त्यामुळे आतापर्यंत आग डम्पिंगला मिथेन आदी वायूमुळे आग लागते असा दावा पालिका करत आली होती. परंतु आयुक्तांच्या आदेशाने आग लावण्यात आल्याचा गुन्हा दाखल झाल्याने आता या ठिकाणी संबंधित विविध ठेकेदार आणि पालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने आगी लावण्यामागे यांचे संगनमत असल्याचा आरोप पुन्हा स्थानिकांनी चालवला आहे. तर आग रोखण्यासाठी पालिकेने या ठिकाणी पुन्हा सीसीटीव्ही बसवणे, सुरक्षा रक्षक नेमणे पासून विविध उपाय योजना केल्या जात असल्याचा दावा केला आहे .

## अंबरनाथच्या जलशुद्धीकरण केंद्रात शॉक लागल्याने तीन कामगारांचा मृत्यू

**■ठाणे, रोहित जैसवाल :**

अंबरनाथच्या जांभूळजलशुद्धी केंद्रामध्ये पाण्याची टाकी बांधण्याचे काम सुरू असताना शॉक लागल्याने तीन कामगारांचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. गुरुवारी दुपारी ही दुर्घटना घडली आहे. शालिग्राम मंडल (१८), गुलशन मंडल (१८), राजन मंडल (१९) अशी मृतांची नावे आहेत. काम करताना तेथे साचलेले पाणी काढण्यासाठी पाण्याचा पंप लावला होता. अचानक हा पंप बंद पडल्याने सहा कामगार पंप सुरू करण्यासाठी गेले. त्यातील तिघांनी पंप उचलण्याचा प्रयत्न केला असता त्यांना शॉक लागला. या दुर्घटनेत एक कामगार गंभीर जखमी झाला. मात्र, दोन कामगारांनी जीव वाचवण्यासाठी पळ काढल्याने ते



थोडक्यात बचावले. बारवी नदीतून पाणी उचलून ते पाणी संपूर्ण ठाणे जिल्ह्याला पुरवठा करण्यासाठी नव्याने जलशुद्धीकरण केंद्राची बांधण्याचे काम सुरू आहे. जुन्या जलशुद्धीकरण केंद्राच्या बाजूलाच नव्याने केंद्र उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. जलशुद्धीकरण केंद्रावर ठेकेदाराने दुर्लक्ष केले. काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षेची साधने न दिल्याने त्यांना जीव गमवावा लागला, अशी चर्चा सुरू आहे.

## अलिबागच्या वाडगावला 'माळीण' होण्याचा धोका

**■अलिबाग, सचिन कदम :**

'माळीण' हा शब्द उच्चारला तरी अजूनही अनेकांच्या अंगावर काटा येतो. अलिबाग तालुक्यातील वाडगावचे अजित पवार गटाचे माजी सरपंच जयेंद्र भगत यांनी डोंगर पोखरून माती विकण्याचा गोरखधंदा सुरू केल्याने या गावचा येत्या पावसाळ्यात 'माळीण' होण्याचा धोका आहे. भगत यांच्या या कारनाम्याने गावावर दरड कोसळण्याची भीती असून वाडगावातील हजारो ग्रामस्थांचा जीव टांगणीला लागला आहे.




- अलिबाग शहरालगत असलेल्या वाडगावातील ग्रामपंचायतीमध्ये अजित पवार गटाची सत्ता आहे. त्यामुळे तेथील पदाधिकारी व माजी सरपंच जयेंद्र भगत हे उघडपणे माती चोरून विकतात.
- माती उत्खननाबाबतचे सर्व नियम धाब्यावर बसवून हा संपूर्ण प्रकार सुरू असून सरकारची कोट्यवधी रुपयांची रॉयल्टी बुडत आहे. जिल्हा प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी वाडगाववासीयांनी केली आहे.
- जयेंद्र भगत यांच्या गोरखधंद्याला रोखण्याची हिंमत वन व महसूल विभाग का दाखवत नाही, असा एकच प्रश्न विचारला जात आहे.

अजित पवार गटाच्या बगलबच्च्यांनी माती विकून सरकारला कोट्यवधी रुपयांचा चुना लावला आहे. यासंदर्भात सरकारकडे वारंवार तक्रारी करूनदेखील राजकीय दबावामुळे याकडे वन आणि महसूल विभाग कानाडोळा करत आहे. सततच्या माती उत्खननामुळे एखादी दुर्घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण? सरकार आमच्या मृत्यूची वाट पाहात आहे काय, असा संतप्त सवाल गावकऱ्यांनी केला आहे. डोंगराच्या पायथ्याशी वाडगाव वसले आहे. लालमातीचा हा संपूर्ण डोंगरच फोडण्याचे काम सध्या सुरू आहे. त्याची माती सर्रासपणे इतरत्र विकण्यात येते. डोंगराखालच्या जमिनीत प्लॉट काढून ते विकले जात आहेत. दुसरा डोंगर फोडून त्यावरील जमिनीवरदेखील कब्जा करण्याचा प्रयत्न माजी सरपंच जयेंद्र भगत करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. डोंगर पोखरण्याचा गोरखधंदा सुरू असून वाडगावात एक हजार कुटुंबे राहतात. हे माती उत्खनन वेळीच थांबले नाही तर 'माळीण'सारखी परिस्थिती उद्भवू शकते, असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

तहसीलदार, प्रांत व जिल्हाधिकारी यांनी काहीच लक्ष न दिल्याने शेकापचे आमदार जयंत पाटील यांनी २२ ऑगस्ट २०२२ रोजी विधिमंडळात आवाज उठवला होता. त्यानंतरही प्रशासन कुंभकर्ण अवस्थेत असून लवकरात लवकर माती उत्खनन थांबवले नाही तर ग्रामस्थांच्या संतापाचा भडका उडण्याची शक्यता आहे.

## महिलाच चालवत होती सेक्स रॅकेट
### ठाण्यात अटक



**■ठाणे, भावना जैन**

घोडबंदर रोडवरील सिनेवंडर मॉलसमोरील सेवा रस्त्यावर शरीर विक्रयसाठी आणलेल्या दोन पीडित तरुणींची ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने सुटका केली आहे. हे सेक्स रॅकेट चालवणाऱ्या एका दलाल महिलेला याप्रकरणी अटक केल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक चेतना चौधरी यांनी दिली. ठाण्यातील घोडबंदर रोड, सिनेवंडर मॉलसमोरील सर्विस रोडवर एक महिला दोन तरुणींना शरीर विक्रयच्या व्यवसायासाठी घेऊन येणार असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला मिळाली होती. त्याच आधारे या पथकाने बनावट गिऱ्हाइकांच्या मदतीने सापळा लावला. याच सापळ्यात एका दलाल महिलेला ताब्यात घेतले असून तिच्या तावडीतून दोन पीडित तरुणींची सुटका केली आहे. या महिलेविरुद्ध चितळसर पोलिस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल केला आहे. पीडित तरुणींना सुरक्षिततेच्या दृष्टीने चितळसर मानपाडा येथील एका सुरक्षागृहात ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# क्रोकरी करा चकाचक

**प्रत्येक** महिलेला वाटते स्वयंपाकघरात काचेची उपकरणे असावीत. क्रोकरीचे आकर्षक प्रकार बाजारात उपलब्ध असल्यामुळे त्याची भुरळ पडल्याशिवाय राहात नाही. डायनिंग टेबलवर स्टायलिश क्रोकरी अधिक शोभून दिसतात. मात्र ही काचेची भांडी बरीच महाग असतात. शिवाय त्यांचा वापर अत्यंत



काळजीपूर्वक करावा लागतो. खबरदारी घेतली नाही तर किती सामानाचे नुकसान होण्याची शक्यता असते.

स्वच्छतेबाबतही क्रोकरीची विशेष काळजी घ्यावी लागते. काचेची चमक टिकून राहण्याचे काही वेगळे मार्ग अवलंबावे लागतात. आज यासंबंधी काही महत्त्वाच्या टिप्स जाणून घेऊ या. क्रोकरीवर डाग राहू नये, असे वाटत असेल तर ती वेळच्या वेळी स्वच्छ करायला हवी. फार काळ अस्वच्छ अवस्थेत ठेवल्यास डाग टिकून राहतात आणि स्वच्छ करणे कठीण होते. काचेची भांडी स्वच्छ करण्यासाठी गार पाण्याऐवजी गरम पाण्याचा वापर करावा. गरम पाण्याचा वापर केल्याने साबणाचा कमीत कमी वापर करून ही भांडी स्वच्छ करणे शक्य होते. गरम पाण्यामुळे भांडी स्वच्छ होतातच, शिवाय त्यावरील जीवजंतूंचाही नायनाट होतो. क्रोकरी स्वच्छ केल्यानंतर काही काळ व्हिनेगर मिसळलेल्या पाण्यात बुडवून ठेवावी. काही वेळाने बाहेर काढून न धुताच भांडी सुकवावी. यामुळे क्रोकरीची चमक टिकून राहते.

# फीट आणि योग्य : बूट हुशारीने निवडा!

**चप्पल आपल्याला संरक्षण देतात आणि ती एक फॅशन ॲक्सेसरीही आहे. अनेकदा चुकीचे फुटवेअर वापरले जातात, तेव्हा त्याचे शरीरावरील परिणाम समजून घेतल्याने आणि योग्य बूट निवडल्याने तुमच्या समस्या सुटू शकतात.**

**हाय हिल्स :**
हाय हिल्समुळे पायाच्या चवड्यांवर अतिरिक्त ताण येतो आणि त्यामुळे वेदना तसेच कॉलोसाइट्सचा त्रास होतो. त्यांच्यामुळे आपले घोटेही मुरगळू शकतात. हाय हिल्सचा दीर्घकाळ वापर केल्यामुळे पोटरीचे स्नायू लहान होऊ शकतात आणि पायात वेदना होतात. ते गुडघे, नितंब आणि मणक्यांवर अतिरिक्त ताण आणतात. त्यामुळे इतर समस्या उद्‌भवू शकतात. नियमित वापरासाठी २ इंचापेक्षा जास्त हिल्स वापरणे टाळा.

**फूटवेअर आणि गुडघ्याचे ऑस्टिओआर्थरायटिस :**
तुम्हाला गुडघ्याच्या वेदना किंवा आर्थरायटिसचा त्रास असल्यास कठीण किंवा टणक बूट आणि हाय हिल्स घालणे टाळा. संशोधनातून असे दिसून आले आहे की, कमी हिल्सचे लवचिक फूटवेअर (०.५ इंच) गुडघ्यांवरील ताण कमी करते.

**फूटवेअर आणि मधुमेह :**
दीर्घकाळ मधुमेह असल्यामुळे नसांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे पायात बधीरपणा येतो. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला पायात कापलेले किंवा पुरळ आलेले जाणवत नाही आणि ते वेगाने गंभीर संसर्गात परावर्तित होऊ शकते.

**फीट**
नवीन फूटवेअर खरेदी करताना तुमच्या पायांची लांबी आणि रुंदी मोजून घ्या. कारण, काळानुसार तुमच्या पायांचा आकार बदलू शकतो. तुम्ही पायाचा आकार संध्याकाळी मोजला पाहिजे, कारण दिवस संपताना पाय थोडासा सुजतो. तुमचे अंगठ्याचे बोट आणि बुटाचे टोक यांच्यामध्ये साधारण अर्धा इंच जागा असली पाहिजे. तुमच्या पायाचा सर्वात मोठा भाग बुटामध्ये घट्ट बसला किंवा चिमटला जायला नको. तुमचे बूट पायापेक्षा लहान असल्यास तुमच्या टाचेला त्रास होऊ शकतो. निमुळत्या फूटवेअरमुळे कॉर्न किंवा बुनियन्स होऊ शकतात. बूट खूप मोठे असल्यास घसरल्यामुळे पुरळ आणि वेदना होऊ शकतात.



**योग्य फूटवेअरचा वापर**

**फील :**
तुम्हाला चपलेत आरामदायी वाटले पाहिजे. आरामदायीपणा तपासण्यासाठी स्टोअरमध्ये नवीन चप्पल घालून चाला. तुमचा पाय जमिनीवर आपटतो तेव्हा त्याचा परिणाम कमी करण्यासाठी बुटाला पुरेशा प्रमाणात कुशन असले पाहिजे. लक्षात ठेवा, बूट तुमच्या पायानुसार असावेत, पाय बुटांप्रमाणे जुळवू नका.

**फ्रेमवर्क :**
चौरस किंवा गोल टो-बॉक्स असलेले बूट निवडा. टोकदार टो-बॉक्स असल्यास तुम्हाला कॉर्न, कॅलॉसाइटिस, बुनियन्स, टाचेतील नादुरुस्ती आणि पुरळ यांचा त्रास होऊ शकतो. बुटाची पुढची बाजू तुमच्या पायाच्या पुढच्या बाजूशी जुळती असावी. हील काऊंटर (बुटाची मागची बाजू) इतकी मजबूत असावी की, पाय मुरगळणार नाही आणि तुमच्या घोट्याला सपोर्ट मिळेल.

**बूट बदलण्याची वेळ कधी :**
तुमचे बूट खूप घासलेले असल्यास, तुमच्या घोट्याकडेही घासलेले असल्यास ते घर्षण आणि वापराचे परिणाम किंवा चिन्हे आहेत आणि ती तुमचे बूट बदलण्याची वेळ आहे.





# मधाचे फेसपॅक

**मध हे आपल्या आरोग्यासाठी औषधी आहे. मध हे आपल्या त्वचेवरही गुणकारी असल्याचे सिद्ध झाले आहे. बाजारात आलेले केमिकलयुक्त फेसपॅकमुळे आपल्या त्वचेवर विपरित परिणाम होत असतो. मधाचा फेसपॅक घरच्या घरी तयार करून आपली त्वचेचा सतेजपणा कायम ठेवता येऊ शकतो.**

▮ मुलतानी मातीचे पावडर, गुलाबजल, मध (शहद) व संत्र्याचा रस प्रत्येक एक-एक चमचा घेऊन त्याची पेस्ट तयार करून रात्री झोपण्याआधी चेहऱ्यावर लावावी. १० ते १५ मिनिटांनी चेहरा स्वच्छ करावा.

▮ एक चमचा मधात एका अंड्याच्या बलक घालून चेहऱ्यावर लावावा. १० मिनिटानी चेहरा स्वच्छ करावा.

▮ पिकलेल्या केळीचा गर, कणीक व एक मोठा चमचा मध यांची पेस्ट चेहऱ्यावर लावावी. १० मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करावा.

# सतत जांभया येत आहेत का? मग त्यामागे असू शकतात ही कारणे

**वारंवार** जांभया येत असतील तर झोप अपुरी झाली असल्याचे हे लक्षण असल्याचे आपण मानतो. मात्र केवळ झोप अपुरी झाली असली तरच सतत जांभया येतात असे नाही. यामागे अन्य काही कारणेही असू शकतात. ही कारणे जाणून घेऊ या. सातत्याने येणाऱ्या जांभया हे मानसिक तणावाचे लक्षण असू शकते. मानसिक तणाव जास्त असेल, तर त्याचा परिणाम मेंदूच्या सक्रियतेवरही होत असतो. त्यामुळे मेंदूला सक्रिय ठेवण्यासाठी प्राणवायूचा पुरेसा



पुरवठा होण्यासाठी वारंवार जांभया येऊ लागतात. मेंदूला प्राणवायूचा पुरवठा कमी होत असेल तर याचा परिणाम फुफ्फुसांच्या कार्यावरही होतो. यादरम्यान फुफ्फुसांमध्ये प्राणवायूची मात्रा कमी होऊन कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढले, तर हा वायू कमी करून प्राणवायूची पातळी वाढवण्यासाठी देखील आपल्याला जांभई येते. जांभई आल्याने मेंदूमधील प्राणवायूचा पुरवठा झपाट्याने वाढतो आणि फुफ्फुसांमध्ये साठून राहिलेला कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडण्यास मदत होते.

# पाठदुखी, कंबरदुखीने हैराण? मग जमिनीवर झोपून पहा

**आजकाल** तरुण वर्गातही पाठदुखी, कंबरदुखी, मणक्याच्या वेदना, श्वास घेण्यास त्रास असे विकार वाढत चालले आहेत. सुखासीन जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव ही कारणे त्यामागे आहेत तसेच रोजच्या आयुष्यात वाढलेले ताणतणाव ही त्याला हातभार लावत आहेत. आपल्या वापरत असलेल्या मऊ मुलायम गाद्या हे विकार अधिक वाढवतात असे निरीक्षण नोंदवले गेले आहे.

मऊ गाद्या, उशा सुखद वाटल्या तरी पाठीची दुखणी, स्वास्थ्यासाठी त्या चांगल्या नाहीत असे तज्ज्ञ सांगतात. मणक्याचे विकार दूर ठेवायचे असतील तर जमिनीवर सतरंजी अथवा पातळ चटई टाकून त्यावर जमिनीला पाठ लावून झोपणे खूपच उपयुक्त ठरते. अशा विश्रांतीचे अनेक फायदे होतात.




पहिले म्हणजे जमिनीला पाठ लावून झोपण्याने पाठीचा कणा योग्य स्थितीत राहतो. उशी न घेता झोपले तर श्वास घेण्यास होत असलेला त्रास दूर होतो.

एखाद्या रात्री झोप येत नसेल तर अशा प्रकारे जमिनीवर झोपून पहा, शांत झोप येते.

खांदे, कुल्ले या ठिकाणी वेदना होत असतील तर जमिनीवर झोपण्याने त्या हळूहळू कमी होत जातात. पाठदुखीचा त्रास कमी होतो. गादीवर झोपल्याने शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे शरीरात उष्णता वाढते. चटई अथवा सतरंजी घालून जमिनीवर झोपल्यास हा त्रास होत नाही, शिवाय रक्तप्रवाह सुरळीत राहतो आणि मेंदू शांत राहतो. स्नायूंना आराम मिळतो.

# शशांक केतकरने सध्याच्या राजकारणावर मांडलं परखड मत, शरद पवार व अमित शाहांचा उल्लेख करत म्हणाला...



नाटक, मालिका, चित्रपटाच्या माध्यमातून घराघरात पोहोचलेल्या शशांक केतकरने हिंदीतही आपला ठसा उमटवला आहे. 'तेलगी स्कॅम २००३', 'शोटाइम' या हिंदी वेब सीरिजनंतर अजूनही आगामी हिंदी प्रोजेक्टमध्ये तो पाहायला मिळणार आहे. सध्या शशांक 'मुरांबा' या मालिकेतून दररोज प्रेक्षकांच्या भेटीस येत आला. या मालिकेत त्याने साकारलेला अक्षय मुकादम प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस पडला आहे. अशातच शशांकने लोकसभा निवडणुका आणि सध्याच्या राजकारणावर परखड मत मांडलं आहे.

'तारांगण' या एंटरटेनमेंट युट्यूब चॅनेलशी संवाद साधताना शशांकला विचारण्यात आलं की, तुझं राजकारणाकडे लक्ष असतं का? यावर अभिनेता म्हणाले, "१०० टक्के माझं लक्ष आहे. ही सजगता कुठून आली तर, मी एक कलाकार असण्यापूर्वी एक माणूस आहे. माणूस आहे म्हणूनच मला आजूबाजूला समस्या दिसतात. जर मी हवेत राहून म्हटलं असतं की, मी कलाकार आहे. मला कुठलेही समस्या नाही. तर मी हे स्वतःशी खोटं बोलतोय असं मला वाटतं. मी माणूस आहे, मी आजूबाजूला फिरताना, भाजी विकत घेताना, बाहेर रांगेमध्ये उभं राहताना, टोल भरताना, रस्त्यावर गाडी चालवताना, चालताना, चित्रीकरण करताना, मला आजूबाजूच्या अनेक समस्या दिसतात. एवढंच नाहीतर त्याबरोबरीने देशात होणारा विकास सुद्धा दिसत आहे. तर मी फक्त आंधळेपणाने कुणाचं कौतुक करत नाही. ज्यांनी चांगली कामे केली आहेत, त्याच मी अगदी तोंडभरून कौतुक करतो. कारण इतकी प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या देशामध्ये, त्या देशाचा वेग न थांबता तुम्हाला सगळा विकास करायचा आहे. ही फार मोठी आणि अवघड गोष्ट आहे. होणारी जी काम सुरू आहेत ती छान पद्धतीने सुरू आहेत. अशावेळी इतर काम करणं देखील गरजेचं आहे आणि जिथे जिथे काम रखडली आहेत. त्यावर सुद्धा मी आवर्जुन बोलतो."

पुढे शशांकला विचारलं की, लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय पक्षाची झुंज चालू आहे. आरोप-प्रत्यारोप करतायत. आधी एकत्र होते. आता भांडतं आहे, याचा त्रास होतो का? या प्रश्नाचं उत्तर देताना शशांक म्हणाला, "त्रास होतो. पण हे आता काही पहिल्यांदा घडत नाहीये. याआधी अनेकदा घडलं आहे. परवाच मी एक गोष्ट ऐकत होतो की, अमित शाहांचा मुलगा बीसीसीआयचा अध्यक्ष कसा काय होऊ शकतो? त्याने कुठे क्रिकेट खेळलंय? वगैरे...मग माननीय शरदचंद्र पवारजी सुद्धा आयसीसीचे अध्यक्ष होते. त्यांनी सुद्धा कुठे क्रिकेट खेळलं आहे. त्यामुळे त्याच्यातलं नॉलेज आणि त्यासाठी लागणारा जो बिझनेस माणूस आणू शकतो अशा योग्य माणसाला त्या पदी बसवलं जातं. हे आपल्याकडे अनेकदा घडलं आहे."

## "मी माझं नावच विसरले" मिताली मयेकरने सांगितला 'तो' किस्सा
# सिद्धार्थ म्हणाला, "शंखपुष्पी प्यायचं बाळा..."



मराठी अभिनेत्री मिताली मयेकरनं अवघ्या १३ व्या वर्षात इरफान खान अभिनीत 'बिल्लू' चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण केलं. 'फ्रेशर्स', 'लाडाची मी लेक गं' अशा अनेक मालिकांमधून मिताली प्रसिद्धीझोतात आली. मिताली आपल्या अभिनयासह वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टीही सोशल मीडियावर शेअर करीत असते. विनोदी रील्स, ट्रॅव्हल्स व्हिडीओ अशा प्रकारच्या कॉन्टेन्ट्सचा त्यामध्ये समावेश असतो. अशातच मितालीनं सोशल मीडियावर एक किस्सा शेअर केला आहे; ज्यात एकदा ती स्वतःचं नाव विसरली होती.

मितालीनं तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून एक व्हिडीओ शेअर केला आहे; ज्यात मितालीने तिच्या चिंताग्रस्त स्वभावाबद्दल भाष्य केलं आहे. मिताली म्हणाली, "मी तुम्हाला एक विनोदी वस्तुस्थिती सांगते. बँका, रुग्णालयं, विमानतळ, व्हिसा अर्ज केंद्र यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी माझी चिंता खूप वाढते. मला असं वाटत राहतं की, माझ्या कागदपत्रांकडे ते एकदा नजर मारतील आणि सांगतील की, तुमची सगळी कागदपत्रं चुकीची आहेत आणि आता तुम्ही घरी जाऊ शकता."

मिताली पुढे म्हणाली, "माझी आज एक व्हिसा अपॉइंटमेंट होती आणि अर्थात, मी खूप चिंताग्रस्त होते. मी तिकडे गेले. जो माणूस या संदर्भात मला मदत करणार होता, तो मला भेटला. मी माझी कागदपत्रं त्याला दिली आणि त्यानं मला सांगितलं की, कॅमेऱ्याकडे बघा आणि प्रश्नांची उत्तरं द्या. मग मी कॅमेऱ्याकडे बघितलं. त्यानं माझं नाव विचारलं आणि मी शांत राहिले. मी माझ नावच विसरले. मी तिकडेच स्तब्ध झाले आणि माझं नाव विसरले. तो हसू लागला. मग थोडाफार आत्मविश्वास जमा करून, मी म्हटलं, मिताली मयेकर. नंतर त्यानं मला जन्मतारीख विचारली आणि मी लगेच म्हणाले, ८८२८... आणि मी लगेच थांबले. कारण- मी जन्मतारीख सांगण्याऐवजी माझा मोबाईल नंबर सांगत होते."

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 7 | 9 | | 8 | 2 | 3 |
| | | | 2 | | | | 4 | |
| 3 | 7 | | | | 5 | | | |
| 7 | 8 | | | | | 6 | | 4 |
| | | | 9 | | | 1 | | 5 |
| | | 1 | 3 | | | | 7 | |
| 5 | | | | 7 | | | | |
| 2 | | 9 | 4 | 3 | | 7 | | |
| | | | | | 2 | | 1 | |

## उत्तर सुडोकू -४८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5 | 7 | 9 | 2 | 6 | 4 | 3 | 8 |
| 8 | 9 | 6 | 4 | 3 | 7 | 1 | 5 | 2 |
| 2 | 3 | 4 | 8 | 5 | 1 | 6 | 7 | 9 |
| 3 | 2 | 8 | 1 | 9 | 5 | 7 | 4 | 6 |
| 9 | 6 | 5 | 2 | 7 | 4 | 8 | 1 | 3 |
| 7 | 4 | 1 | 3 | 6 | 8 | 9 | 2 | 5 |
| 4 | 1 | 9 | 5 | 8 | 3 | 2 | 6 | 7 |
| 5 | 7 | 2 | 6 | 1 | 9 | 3 | 8 | 4 |
| 6 | 8 | 3 | 7 | 4 | 2 | 5 | 9 | 1 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांचा अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### ६ एप्रिल

- ◆१६५६: शिवाजी महाराजांनी चंद्रराव मोरे यांचा पराभव करुन रायगड किल्ला ताब्यात घेतला.
- ◆१८९६: आधुनिक ऑलिम्पिक खेळांची ग्रीसमधील अथेन्स येथे सुरूवात झाली. ग्रीक सम्राट थेडोसियस (पहिला) याने घातलेल्या बंदीमुळे १५०० वर्षे हे खेळ बंद होते.
- ◆१९१७: पहिले महायुद्ध झ्र अमेरिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
- ◆१९३०: प्रसिद्ध दांडीयात्रेनंतर गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला.
- ◆१९६५: व्यापारी उपयोग करता येईल अशा प्रकारे संदेशवहन करण्याची सोय असलेला अर्ली बर्ड हा उपग्रह अमेरिकेने अंतराळत सोडला
- ◆१९६६: भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी भारत व पाकिस्तानला जोडणारी पाल्कची सामुद्रधुनी पोहून पार केली.
- ◆१९८०: भारतीय जनता पक्षाची (इखढ) स्थापना झाली व अटलबिहारी वाजपेयी तिचे पहिले अध्यक्ष झाले.
- ◆१९९८: भारतापर्यंत सहज पोहोचू शकर्णाया मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची पाकिस्तानने यशस्वी चाचणी केली.
- ◆१९९८: स्तनांचा कर्करोग बरा करर्णाया टॅमॉक्सीफेन या औषधाच्या चाचणीचे निकाल जाहीर करण्यात आले. या औषधामुळे होर्णाया दुष्परिणामांमुळे गर्भाशयाच्या कर्करोगाची शक्यता वाढते, असे जाहीर करण्यात आले.
- ◆२०००: मीर या रशियाच्या अंतरिक्ष प्रयोगशाळेला जीवदान देण्यासाठी सोडलेले सोयूझ हे अंतराळयान मीर ला भेटले.
- ◆१७७३: स्कॉटिश तत्त्ववेत्ते, इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ जेम्स मिल यांचा जन्म. (मृत्यू: २३ जून १८३६)
- ◆१८६४: ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ सर विल्यम हार्डी यांचा जन्म. (मृत्यू: २३ जानेवारी १९३४)
- ◆१८९०: फोक्कर एअरक्राफ्ट मॅनुफॅक्चर चे निमार्ते अँटनी फोक्कर यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर १९३९)
- ◆१८९०: उर्दू कवी व शायर अली सिकंदर ऊर्फ जिगर मोरादाबादी यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९६०)
- ◆१८९२: डग्लस एअरक्राफ्ट कंपनी चे निमार्ते डोनाल्ड विल्स डग्लस यांचॅह जन्म. (मृत्यू: १ फेब्रुवारी १९८१)
- ◆१९०९: भावगीतगायक व संगीतकार जी. एन. जोशी यांचा जन्म. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९९४)
- ◆१९१७: मराठी कथाकार व कवी काव्यतीर्थ हणमंत नरहर जोशी तथा कवी सुधांशु यांचा जन्म. (मृत्यू: १८ नोव्हेंबर २००६)
- ◆१९१९: कोंकणी कवी रघुनाथ विष्णू पंडित यांचा जन्म.
- ◆१९२७: उद्योजक विष्णू महेश्वर ऊर्फ व्ही. एम. तथा दादासाहेब जोग यांचा जन्म. (मृत्यू: २८ जून २०००)
- ◆१९२८: फ्रान्सिस क्रीक व मॉरिस विल्कीन्स या जोडीदारांसह डीएनएची संरचना स्पष्ट करणारे नोबेल पारितोषिक विजेते जैवरसायनशास्त्रज्ञ जेम्स वॉटसन यांचा जन्म.

## भविष्य

**मेष** दूरच्या प्रवासाचा योग येईल. जास्त धाडस करू नका. व्यावसायिक प्रगतीचे दर उघडेल. सर्वांशी गोडीगुलाबीने वागाल.

**वृषभ** व्यावसायिक बदलाचे वारे मनात वाहू लागतील. कामाच्या ठिकाणी तुमचे वर्चस्व वाढेल. मुलांकडून चांगल्या बातम्या मिळतील.

**मिथुन** मनातील आकांक्षा विनासायास पूर्ण होतील. तरुण वगार्ने कसलीही घाई करू नये. मुलांकडून शुभ वार्ता मिळतील. योग्य ठिकाणी गुंतवणूक करावी.

**कर्क** महत्त्वाच्या कागदपत्रांची काळजी घ्यावी. वरिष्ठांना नाराज करू नका. धार्मिक कायार्चा लाभ घ्यावा. भावंडांची काळजी लागून राहील. कलाकारांना प्रसिद्धी मिळेल.

**सिंह** तुमचा मनमोकळा स्वभाव इतरांच्या नजरेत भरेल. वरिष्ठांच्या शाबासकीस पात्र व्हावे. प्रेमप्रकरणातील जवळीक त्रासदायक ठरू शकते. कौटुंबिक स्वास्थ्य जपावे.

**कन्या** मुलांचा व्रात्यपणा वाढू शकतो. कामात चिकाटी ठेवावी लागेल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल. जुन्या कामातून लाभ संभवतो. अति अपेक्षा बाळगू नका.

**तुला** हाती सोपवलेले काम वेळेत तडीस न्याल. कामात कसलीही घाई उपयोगाची नाही. डोके ठिकाणावर ठेवून वागावे. कौटुंबिक बाजू ध्यानात घेऊन वागावे. घेतलेल्या कष्टाचे चीज होईल.

**वृश्चिक** जोडीदाराशी अनबन टाळावी. स्वकष्टाने आर्थिक बाजू सुधाराल. आपल्या वागण्याने कोणी दुखवणार नाही याची काळजी घ्यावी. सत्य-असत्याची खातरजमा करावी.

**धनु** बाह्यरुपावर भुलू नका. काटकसरीचा मार्ग अवलंबाल. नवीन आव्हानाला सामोरे जाल. तुमची काम करण्याची शक्ति वाढेल. तुमचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

**मकर** सर्वांशी मधुर वाणीने बोलाल. कौटुंबिक जबाबदारी वाढू शकते. तुमच्या संभाषणाची उत्तम छाप पडेल. कामात अधिक उत्साह येईल. तुमची महत्त्वाकांक्षा वाढीस लागेल.

**कुंभ** व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. काही गोष्टींचे धोरण ठरवावे लागेल. सामाजिक गोष्टींची जाणीव ठेवावी. गुरूजनांचा आशीर्वाद लाभेल. तुमची मानमान्यता वाढेल. फसवणुकीपासून सावध राहावे.

**मीन** नैराश्याला बळी पडू नका. फसवणुकीपासून सावध राहावे. मैत्रीचे नाते जपावे. जमिनीच्या कामास गतीमानता येईल. अति श्रमाचा थकवा जाणवेल. जवळचा प्रवास घडेल. जोडीदाराविषयी मतभेद संभवतात.


Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# दे दान... कोणते 'गिऱ्हाण'?

निवडणूक रोख्यांद्वारे दानधर्म करणाऱ्या ४५ कंपन्यांपैकी ३३ कंपन्यांनी कमावलेला नफा शून्य रु. अथवा उणे इतका आहे... ''भूक असताना अन्न सेवन केल्यास प्रकृती, नसताना केल्यास विकृती आणि भूक असतानाही आपल्यापेक्षाही अधिक भुकेलेल्यास ते दिल्यास ती संस्कृती'', अशा अर्थाचे आचार्य विनोबा भावे यांचे एक वचन आहे. त्याचा आधार घेतल्यास आपल्या अनेक कंपन्या, उद्योग कसे संस्कृतीचे पाईक, संस्कृतिरक्षक इत्यादी आहेत हे पाहून अभिमानाने छाती फुलून येईल. या संस्कृतिरक्षणाचा साद्यांत तपशील 'द हिंदू' या दैनिकाने गुरुवारी प्रकाशित केला असून ज्यांस ते मुळातून वाचणे शक्य होणार नाही, त्यांच्यासाठी त्या वृत्तान्ताचा हा अन्वयार्थ. कोणतीही व्यक्ती उद्योग वा व्यापारउदीम सुरू करते त्यामागे चार पैसे हाती पडावेत हा उद्देश असतो. त्यात काहीही गैर नाही. या अशा वैयक्तिक आशा-आकांक्षांतूनच स्वतःची आणि इतरांचीही प्रगती होते. नपेक्षा उगाच 'आहे त्यात समाधान मानणे' वगैरे तत्त्वज्ञानाधारे जगू गेल्यास प्रगती खुंटते. आहे ती स्थिती बदलणे हेच कोणत्याही प्रगतिसाधकाचे उद्दिष्ट असते. अशी इच्छा व्यक्तीस वा व्यक्तिसमूहास आणि अंतिमतः देशास प्रगतीची नवनवी शिखरे काबीज करण्यास मदत करते. तेव्हा उद्योगामागील हा विचार मूळ. कोणी काही नवे हाती घेतो ते या ओढीने. म्हणजे कोणतीही व्यक्ती एखाद्या उद्योगास हात घालते ते काही त्या प्रदेशातील बेरोजगारी कमी व्हावी या हेतूने नाही. बेरोजगारी घटेल हा या उद्योगस्थापनेमागील सह-विचार. तो करण्याआधी संबंधित व्यक्तीने बाजारपेठेचा अभ्यास केलेला असतो आणि कोणत्या उत्पादनाची गरज बाजारपेठेत अधिक आहे आणि कोणत्या प्रकारे कमीत कमी खर्चात ते उत्पादन बाजारात आणून जास्तीत जास्त नफा मिळवता येईल, हा त्याचा विचार असतो. तो तसाच असायला हवा. या अशा पद्धतीने 'धन जोडोनिया उत्तम व्यवहारे' हे साध्य झाले की त्यापुढची स्थिती येते. ती म्हणजे हे धन 'उदास विचारे वेच करी', ही. चांगल्या मार्गाने व्यवसाय/ उद्योग करून उत्तम धन कमवायचे आणि त्यातील काही वाटा सत्कर्मार्थ द्यायचा हीच शहाणी, समंजस रीत. व्यवसायात काहीही नफा नाही, तिजोरीत खडखडाट, कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्या पुरवण्याइतकीही कमाई नाही आणि तरीही दानधर्म मात्र सढळ हस्ते असे होऊ शकत नाही. तसे असेल तर ते करणाऱ्या व्यक्तीच्या बौद्धिक स्थैर्याविषयी आणि दानधर्मार्थ रकमांच्या उगमाविषयी संशय घेता येईल. किंबहुना तो घ्यायला हवा. 'द हिंदू'चे संशोधक वृत्त याच संदर्भातील आहे. त्यातून ज्या कंपन्यांच्या खात्यात कसलाही नफा नाही त्यांनीही राजकीय पक्षांस कशा अवाढव्य देणग्या दिल्या आणि या अवाढव्य देणग्यांतील अवाढव्य वाटा एकाच पक्षास कसा मिळाला याचा तपशील समोर येतो. त्याची दखल घेणे हे प्रबोधक आणि मनोरंजक असे दोन्ही एकाच वेळी ठरू शकेल. प्रबोधन करणारे म्हणायचे कारण भांडवलाची फेरगुंतवणूक, कर्मचाऱ्यांस अधिक वेतन इत्यादी कारणांपेक्षा आपले उद्योगपती राजकीय पक्षांवर अधिक रक्कम खर्च करू इच्छितात हे यातून दिसते आणि इतक्या साऱ्या राजकीय कृपाभिलाषींना एकाच वेळी पाहणे हे मनोरंजक ठरते. यानुसार १२ एप्रिल २०१९ ते २४ जानेवारी २०२४ या काळात ४५ कंपन्यांनी एकूण १४३२ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले. हा काल-संदर्भ महत्त्वाचा. आधीच्या लोकसभा निवडणुका कधी झाल्या आणि यंदा सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण कधी निकालात काढले या तारखा लक्षात घेतल्यास ही बाब ध्यानी येईल. या १४३२ कोटी रुपयांपैकी १०६८ कोटी रु. हे केंद्रातील सत्ताधारी पक्षास दिले गेले. हे प्रमाण साधारण ७५ टक्के इतके भरते. तथापि यातील प्रबोधक आणि मनोरंजक तपशील असा की हा इतका दानधर्म करणाऱ्या ४५ कंपन्यांपैकी ३३ कंपन्यांनी कमावलेला नफा वट्ट शून्य रु. अथवा उणे इतका आहे. परत या ३३ कंपन्यांखेरीज सहा कंपन्या अशा आहेत की त्यांनी खरेदी केलेल्या निवडणूक रोख्यांची रक्कम त्यांनी कमावलेल्या एकूण नफ्यापेक्षा किती तरी अधिक आहे. उर्वरित तीन कंपन्यांनी नफा कमावला. पण तरी त्यांनी कर भरल्याची नोंद नाही आणि अन्य तीन कंपन्यांनी किती कमावले, किती कर भरला याची कसलीही नोंदच उपलब्ध नाही. सदरहू वर्तमानपत्रातील पत्रकार आणि स्वतंत्र सांख्यिकी विश्लेषकांनी रोखे खरेदी करणाऱ्या तब्बल ३८५ कंपन्यांच्या ताळेबंदांची, जेथून रोखे खरेदी केले गेले त्या स्टेट बँकेने प्रसृत केलेल्या माहितीची आणि निवडणूक आयोगाने उघड केलेल्या तपशिलाची सविस्तर छाननी केली. या ३८५ कंपन्यांकडून एकत्रितपणे सुमारे ५३६२ कोटी रुपयांची रोखेखरेदी झाली आणि ती सर्व केंद्रीय सत्ताधारी पक्षाकडे वळती केली गेली, ही माहिती समोर येते. हे दानशूर कोण हे समजून घेणेही तितकेच आनंददायक! उदाहरणार्थ यातील डीएलएफ लग्झरी होम या कंपनीची नोंद पाहा. उपरोल्लेखित काळात या कंपनीस झालेला तोटा १२८ कोटी रुपयांच्या आसपास आहे आणि तरीही या कंपनीचे दातृत्व असे की तिने २५ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले आणि ते सर्वच्या सर्व सत्ताधारी पक्षाच्या तिजोरीत गेले. विद्यमान सत्ताधारी पक्षाच्या कडव्या टीकाकार सोनिया गांधी यांचे जामात रॉबर्ट वढेरा यांच्यावर डीएलएफ कंपनीने विशेष वरदहस्त ठेवून काही जमीन व्यवहार केल्याचे प्रकरण त्या वेळी गाजले होते. खरे तर सध्याच्या नैतिकोत्तम सत्ताधीशांकडून सोनिया गांधी यांच्या या दशम ग्रहास कडक शासन होईल अशीच सगळ्यांची अपेक्षा असणार. योग्यच ती. पण तसे काही झाले नाही. उलट ते प्रकरण मागे पडले. यामागे सदर रोखे आहेत किंवा काय अशी शंका कोणास आल्यास ते अयोग्य असेल काय? यात महाराष्ट्राने विशेष दखल घ्यावी अशी नोंद म्हणजे वरोरा- चंद्रपूर- बल्लारपूर टोल रोड लिमिटेड ही कंपनी. या कंपनीने स्वतःस साडेचार कोटी रुपयांचा तोटा असताना सत्ताधाऱ्यांस सात कोटी रुपयांचे रोखे दिले. पायाभूत सोयीसुविधा क्षेत्रातील कंपन्या रोखेधर्मात अधिक दानशूर असाव्यात असे दिसते. 'धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' कंपनी स्वतः साधारण ३०० कोटी रुपयांनी तोट्यात असताना ११५ कोटी रुपयांचे रोखे ती खरेदी करते ही विशेष कौतुकाची बाब! असे दाखले द्यावे तितके थोडे.

# आचारसंहितेचे बंधन तपासयंत्रणांवरही असू शकते...

**लोकशाहीची आदर्श संकल्पना आणि निवडणूक काळातली आदर्श आचारसंहिता यांचा संबंध किती जवळचा आहे, हे मात्र त्यासाठी समजून घेतले पाहिजे. मग निष्पक्षतेची अपेक्षा ही निव्वळ नैतिक अपेक्षा नाही, हेही उमगेल...**




यंदाच्या लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्तांचे उद्गार केवढे आश्वासक होते! 'निवडणुका खुल्या वातावरणात, सर्वांना समान संधी देऊनच होतील' आणि 'त्यासाठी सर्व पक्षांपर्यंत आदर्श आचारसंहिता आम्ही पोहोचवली आहे. ती पक्षाच्या बड्या प्रचारकांपर्यंतही जावी', 'तक्रारी गांभीर्याने घेतल्या जातील. गय होणार नाही' असे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणत होते!

पण 'खुल्या वातावरणात, सर्वांना समान संधी देऊन' या शब्दप्रयोगाचा अर्थ निवडणुकांच्या बाबतीत कसा लावला जातो? क्रिकेट वा अन्य सांघिक खेळात दोन तुल्यबळ संघांचा सामना असला तरी यजमान संघाला खेळपट्टी 'हवी तशी' करून घेण्यास वाव उरतो. यावर पाहुणा संघ आक्षेप घेतो, पण पुढे कारवाई होतेच असे नाही. दुसऱ्या टोकाचे उदाहरण म्हणजे एखादा बलाढ्य देश दुसऱ्या कमकुवत देशाविरुद्ध युद्ध पुकारतो तेव्हा खोट्यालाच खरे मानणे, मानवी कत्तली हाच एकमेव उपाय समजणे असे प्रकार होतात आणि जेत्याच्या मते वातावरण 'खुले'च असते.

पण लोकशाहीतली निवडणूक म्हणजे निव्वळ एखादा क्रीडासामना नव्हे किंवा युद्धही नव्हे. लोकांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी आपल्यालाच मिळावी, म्हणून इथे अनेक पक्ष आणि उमेदवार स्पर्धेत असतात; मताधिकार बजावून मतदारही काहीएक 'जनादेश' देणार असतात, असा हा सामाजिक करार असल्याने तो खरेपणा आणि विश्वासार्हता यांवर आधारित असावा, ही अपेक्षा रास्त. इथे 'समान संधी'चा मुद्दा येतो, त्यासाठी 'खुल्या वातावरणा'ची गरज भासते. भले काही पक्ष बडे असतील, काही पक्ष वा उमेदवार नगण्य मानले जाणारे असतील- पण लोकशाहीचा आदर म्हणून या सर्वांना समान महत्त्व, हे तत्त्व पाळल्याखेरीज ते मुक्त वातावरण मिळणार नाही. कुणी यावर म्हणेल की, एखाद्या पक्षाचा जनाधार प्रचंडच आहे या वास्तवाकडे काय डोळेझाक करायची की काय! नाही- डोळेझाक नाही करायची. उलट, हे वास्तव ध्यानात ठेवून, तरीसुद्धा सर्वांना मिळणार असलेली संधी समानच असेल असे पाहण्याची जबाबदारी नियंत्रक म्हणून निवडणूक आयोगाने घ्यावी, अशी 'खुल्या वातावरणा'मागची अपेक्षा तत्त्वतः तरी असते. मात्र प्रत्यक्षात असे होत नाही. उलट, सत्ताधारी पक्षाला उपकारक आणि विरोधी पक्षीयांना अपकारक ठरेल अशाच प्रकारचे वातावरण इथे असू शकते, हे निरीक्षणाअंती उमगते. टेनिससारख्या खेळात सीडिंगही नसलेल्या एखाद्या खेळाडूने कौशल्य आणि दमसास यांच्या बळावर प्राथमिक फेऱ्या जिंकत अंतिम फेरीपर्यंत मजल मारावी आणि दिग्गज खेळाडूलाही हरवावे, असे काही इथे होत नाही. निवडणूक हा काही 'खेळ' नव्हे मान्य, पण इथे 'बळ' कसले असते?

प्रत्येक निवडणुकीतून बळ दिसायला हवे, ते खऱ्या लोकशाहीचे. लोकांनी, लोकांसाठी चालवलेल्या राज्यात सर्वांनाच काही नियमांचे समान पालन करावे लागते. कायदे तर असतातच पण निवडणूक काळात तर परस्परांचा आदर, लोकशाहीच्या आपण स्वीकारलेल्या स्वरूपाविषयी काहीएक निष्ठेनेच सारेजण रिंगणात आहेत याची जाण, त्यातून बोलण्यात येणारा संयम हे सारे आवश्यक असते. निवडणूक काळात नियंत्रणाची सूत्रे निवडणूक आयोगाकडे असावीत, हेही सर्वांनी मान्य केलेले असावे लागते आणि हे नियंत्रण आयोगाने ठेवावेही लागते- तेसुद्धा, कुणावरही अन्याय होणार नाही अशा पद्धतीने. अशा स्थितीला आपण 'खुले वातावरण' असे म्हणू शकतो.

### पण परिस्थिती काय आहे?

'निवडणूक आचारसंहिता' चार घटकांना लागू असते: उमेदवार, राजकीय पक्ष, सत्ताधारी पक्ष आणि नोकरशाही. यापैकी शेवटचे दोन घटक हे 'सरकार'चा भाग असतात, पण आदर्श आचारसंहितेच्या त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा निरनिराळ्या असू शकतात. आचारसंहितेत 'दोन समाजघटकांत परस्परांबद्दलचा तिरस्कार वाढेल असे काही करू नये' ही मोठी अपेक्षा असतेच पण 'निराधार आरोप' करू नयेत, व्यक्तिगत टीका टाळावी, 'जातीपातींच्या अथवा धार्मिक भावनांआधारे मते मागू नयेत' आणि उमेदवारांनी वा पक्षांनी कोणतेही 'भ्रष्ट मार्ग'वापरू नयेत, ही बंधने आचारसंहिता घालते. राजकीय पक्ष वा कार्यकर्ते प्रतिस्पर्धी पक्षांच्या कार्यात व्यत्यय आणणार नाहीत, असेही आचारसंहितेत नमूद आहे. प्रचारसभा, मिरवणुका, मतदान केंद्र आणि निवडणूक जाहीरनामे यांचे स्वरूप कसे असावे, याविषयी निरनिराळी प्रकरणे किंवा विभागच या लेखी आचारसंहितेत आहेत. मात्र लक्षात घेण्याजोगी बाब अशी की, याच आदर्श आचारसंहितेने 'केंद्रात वा राज्यात सत्तेत असलेल्या पक्षा'विषयी एक स्वतंत्र विभाग समर्पित केला आहे आणि या विभागात '(सत्ताधाऱ्यांनी) अधिकृत पदाचा वापर केल्याच्या कोणत्याही तक्रारीसाठी कोणतीही सबब वापरली जाऊ नये याची खात्री करण्यासाठी' निर्देश दिलेले आहेत. आचारसंहितेत समाविष्ट केलेला गैरवापर हा मूलतः गेस्ट हाऊस, वाहतूक किंवा सार्वजनिक पायाभूत सुविधा यासारख्या सरकारी सुविधांचा वापर आणि जाहिराती करण्यासाठी किंवा नवीन मंजुरी देण्यासाठी सार्वजनिक निधीचा वापर करण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. पण याच्या पलीकडे आचारसंहिता जात नाही.

निवडणूक आचारसंहिता असेही नमूद करते की, राज्ययंत्रणा आणि कायदा-सुव्यवस्था यंत्रणा यांचे नियमित कामकाज कोणत्याही प्रकारे बाधित होऊ नये. याचा अर्थ असा होतो की, न्यायालयीन सुनावणीसारख्या कायद्याच्या योग्य प्रक्रियेत निवडणूक आयोगाला हस्तक्षेप करणे इष्ट वाटत असेल तर तो करता येणार की नाही किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेद्वारे 'नियमानुसार' म्हणून होणाऱ्या तपासणीवर निवडणूक आयोगाचेही लक्ष असू शकते की नाही, ती तपासणी आयोगाच्या निर्णयाच्या अधीन असेल का, हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. कारण यामुळे परिस्थिती अधिक अस्थिर होऊ शकते. कदाचित, आचारसंहितेचा मसुदा तयार केला गेला तेव्हा राज्य संस्थांकडून अधिकाराचा अशा प्रकारचा गैरवापर होऊ शकतो याची संबंधितांनी कल्पनाही केली नसावी. पण मानवी जीवनव्यवहार जर बदलत असतो, तर आदर्श निवडणूक आचारसंहितेनेही का बदलू नये!

हीच बाब लक्षात घेऊन, २००९ मधील सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असताना, १९ मार्च २००९ च्या पत्राद्वारे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले की वीज नियामक आयोगांसारख्या वैधानिकदृष्ट्या स्वायत्त मानल्या जाणाऱ्या प्राधिकरणांनाही 'आदर्श आचारसंहिता' यापुढे लागू होईल, अशी या संहितेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, अर्थसंकल्प सादर करणे हे निःसंदिग्धपणे वार्षिक कार्य असले तरी निवडणूक आयोगाने ९ मार्च २००९ रोजीच्या पत्राद्वारे स्पष्ट केले की, सार्वत्रिक निवडणूक जवळ आली असल्याने आणि आचारसंहिता लागू असल्याने ज्या राज्यांत विधानसभेचीही निवडणूक होते आहे त्यांनी संपूर्ण अर्थसंकल्प सादर करण्याऐवजी, फक्त लेखानुदान मांडावे.

### आयोगापुढला यक्षप्रश्न

आज घडीचे वातावरण खुले आणि मुक्त नसल्याच्या तक्रारी होत आहेत 'खुल्या वातावरणा'ला आस्थापनेने (सरकारनेच) टाचणी लावल्याच्या या तक्रारी आहेत. अशा वेळी, केंद्रीय निवडणूक आयोगाने २०१९ मध्ये महसूल विभागाला पाठवलेल्या सल्लापत्राचा मजकूर आज पुन्हा आठवण्यासारखा ठरतो. सक्तवसुली संचालनालय अथवा अन्य तपास यंत्रणांनी कोणतीही नवी कारवाई सुरू करण्या आधी कारणीभूत तथ्ये आणि परिस्थिती यांची शहानिशा केलेली असल्याची खात्री करावी, या कारवाया 'निरोगी लोकशाही प्रथे'चे उल्लंघन करतात किंवा कसे हे पडताळण्याची काळजी (महसूल खात्याने) घ्यावी, असे त्या सल्लापत्रात आयोगाने म्हटले होते.

'मुक्त आणि निष्पक्षपाती वातावरणात' निवडणुका पार पाडण्याची सर्वथैव जबाबदारी निवडणूक आयोगाची असायला हवी आणि आयोगाने ती स्वीकारावीच, ही नैतिक अपेक्षा आहे- आपल्या राज्यघटनेत 'खुल्या वातावरणा'चा उल्लेख झालेला नाही. परंतु राज्यघटनेच्या भाग १५ मधील अनुच्छेद ३२४ (१) मधील शब्दयोजनेनुसार सर्व निवडणुकांचे संचालन करण्याच्या कामाखेरीज 'अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण' यांची जबाबदारी निवडणूक आयोगावर असल्यामुळे आदर्श आचारसंहिता लागू करणे, वेळोवेळी या आचारसंहितेत सुधारणा करणे आणि ही आचारसंहिता पाळली जावी याची काळजी घेताना जे ती पाळणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करणे ही कामेही निवडणूक आयोगाकडून अपेक्षितच आहेत. हे लक्षात घेऊन केवळ शाब्दिक कर्तव्य करायचे की नैतिक कर्तव्य पार पाडण्यासाठी आचारसंहितेत वेळोवेळी सुधारणा करायची, हा आयोगापुढला यक्षप्रश्न ठरतो. मात्र एक खरे की, आचारसंहिता ही आज समजली जाते त्यापेक्षा कितीतरी अर्थपूर्ण असू शकते; कारण या आचारसंहितेतच निष्पक्षतेची भावना समाविष्ट आहे. मात्र ही निष्पक्षता पूर्णपणे समजून घेणे आणि खात्रीपूर्वक लागू करणे याची गरज आहे.

# ठाणे-दिवा, जीटीबी-चुनाभट्टी स्थानकांवर दोन नवीन फूटओव्हर ब्रिज होणार सुरू

**■ ठाणे, प्रातिनिधी:**



रेल्वे ट्रॅकच्या अतिक्रमणावर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुंबई रेल विकास कॉर्पोरेशन लिमिटेड ने ठाणे-दिवा विभागात आणि गुरुतेग बहादूर नगर आणि चुनाभट्टी स्थानकांदरम्यान दोन नवीन फूट ओव्हर ब्रिज कार्यान्वित केले आहेत. या पुलांमुळे मध्य रेल्वेच्या उपनगरी भागात पूर्व-पश्चिम कनेक्टिव्हिटी वाढेल. पहिला एफओबी , ५९ मीटर लांब आणि ४ मीटर रुंद, ठाणे-दिवा विभागात आहे. सुमारे ३ कोटी रुपये खर्च करून सात महिन्यांत ते पूर्ण झाले. हे काम २४ ऑगस्ट २०२३ रोजी सुरू झाले आणि यावर्षी ३१ मार्च रोजी पूर्ण झाले. दुसरा एफओबी, ३० मीटर लांबी आणि ४ मीटर रुंदीचा, जीटीबी नगर आणि चुनाभट्टी स्टेशनला जोडतो. ही रचना सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीत दीड कोटी रुपये खर्चून बांधली गेली.

हा प्रकल्प ५ ऑक्टोबर २०२३ रोजी सुरू झाला आणि ३१ मार्च रोजी पूर्ण झाला. मुंबई उपनगरीय विभागांमधील पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रित केले. त्या दस्तऐवजानुसार एफओबी ला दोन्ही टोकांना दोन लिफ्ट्स असण्याचा प्रस्ताव होता पण पुरेशा जागेअभावी त्या पुरवल्या जाऊ शकल्या नाहीत. दस्तऐवजात मध्य रेल्वेवर ३० अतिक्रमणविरोधी संरचना (एफओबीसह) आणि पश्चिम रेल्वेसाठी सात प्रस्तावित आहेत.

# मुलुंड आणि भांडुपकरांसाठी आनंदाची बातमी




**■ ठाणे, प्रातिनिधी:**

मुलुंड ते भांडुप दरम्यान ३ नवीन पूल बांधले जाणार आहेत. त्यामुळे लवकरच शहरवासीयांना तीन नवीन पूल मिळणार आहेत. मुंबई महापालिका हे पूल बांधणार आहे. या भागातील काही पूल जुने आहेत (मुलुंड भांडुप पूल). च्या पुनर्बांधणीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. नवीन पुलांमुळे वाहतूक कोंडी संपेल, असा अंदाज आहे. मुलुंड पूर्वेतील नाणेपाडा नाल्यावर बांधलेला पूल जुना आहे. त्यामुळे हा पूल पाडून नव्याने बांधण्यात येत आहे. मुलुंड पश्चिमेतील सेवाराम ललवाणी रोड आणि शिवमंदिराजवळील पूल आणि भांडुपमधील बॉम्बे ऑक्सिजन कालव्यावरील पुलाचेही रुंदीकरण करण्यात येणार आहे. या तीन पुलांसाठी मुंबई महापालिका सुमारे २२ कोटी रुपये खर्च करणार आहे. मुलुंड पूर्व, जयहिंद कॉलनी मिठागर परिसराला जोडणारा नाणेपाडा नाल्यावर बांधलेला पूल अरुंद आहे. त्यामुळे या पुलावरून मोठी वाहने वळवणे ही मोठी समस्या बनते. तत्कालीन नगरसेवकांनी या पुलाचे रुंदीकरण करण्याची मागणी केली होती. आता या पुलाची रुंदी वाढवण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. त्याची पुनर्बांधणी केली जाईल. पश्चिमेला सेवाराम ललवाणी रोड आणि शिवमंदिराजवळही पुलाचे काम करण्यात येणार आहे. नाणेपाडा पुलाचे काम काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आले होते.

# In a first, private school teachers summoned for election duty




**■ Mumbai**

In a first, teachers from a private school in Mumbai, which doesn't receive any grant or aid from the government, have been ordered to join poll duty. Generally, teachers and staff from government schools or those that receive grants for aid from the government are roped in for election work. The staff has also been warned that if they failed to participate in election duty and training, the police would issue summons against them and register an FIR.

The upcoming Lok Sabha Elections 2024 has disrupted the summer vacation of teachers at the Borivli-based MKVV International Vidyalaya School. The election committee informed teachers that they were required for election duty. Two days ago, an election officer visited the school and handed over a letter to the teachers about the duty call and that it would be preceded by a training session.

Interestingly, in the communication issued by the election office to the teachers, the school has been mentioned as MK Gujarati School which was closed down many years ago and MKVV International Vidyalaya School was opened two decades ago on the premises. It is possible that the election office staff assumed that the MK Gujarati School was still being run on the same premises.

This year, a workforce of over 50,000 has been summoned for election duties across government sectors in Mumbai by the collectors. The collector also enlisted staff from government schools, government-aided schools, and government grant-in-aid schools, where the schools are privately-run but salaries are issued by the government.

Speaking on the condition of anonymity, a teacher from the school said, "We work in a private school and the election commission can't compel us to perform election duty. Two days ago, we received a list of teachers from our school who were required for election duty. We had vacation plans, and I had booked a tour to the US. Suddenly, I was ordered to join election duty, which forced me to cancel my flights and bookings. I even approached the election officers, who threatened an FIR against me."

Another teacher from MKVV School stated, "We don't want to perform election duty because we had planned a tour in that particular month. Election duty is mandatory for government school teachers, not for private schools. How can they compel us? We have requested help from the school principal and the election commission officer but have not received any assistance. They are pressuring and threatening us."

Another school teacher expressed, "We work in a private school. We understand that election duty is a national duty, and we respect that. However, teachers only get vacation during the summer months. My son lives in the UK, and my family has booked flights to visit. Now, we have received this letter from the election committee to join duty. We are unsure of what to do now. Last year, we received a form from the school, related to voting only, not election duty. We feel helpless now."

# "Virat Kohli is under a lot of pressure": Steve Smith




**■ Mumbai**

In the IPL 2024, Royal Challengers Bengaluru lost three games in the four matches and Virat Kohli was the only consistent performer from the batting unit. Former Australian captain Steve Smith feels that Kohli is under a lot of pressure and that other RCB batsmen should support him.

In the IPL 2024, Virat Kohli has smashed 203 runs for RCB in four matches with two half-centuries and at a strike rate of 67.66. Dinesh Karthik is the second batsman to accumulate most runs which is 90 for RCB in four matches.

Glenn Maxwell, skipper Faf du Plessis and Cameron Green are yet to put on an impressive show with the willow.

"He needs the other key batters to stand up with him, and if they do that, they can turn things around for their season. But, at the moment, they're not so a lot of pressure is on Virat," Smith, a member of the Star Sports Incredible Star Cast, told PTI in an exclusive interaction at the channel's studio here. "I doubt he'd be putting extra pressure on himself. (But) some of the other top-order and middle-order (batters) need to help Virat," he said.

Smith warned that Kohli is not going to score runs in every match and RCB batters must get their act together. "He started the campaign really well in the IPL and he needs some support. He's not going to score runs on every occasion," he said.

"But, I doubt he'd be thinking that way. I don't think he'd go out and put extra pressure on himself. He'd just go out and play and see what happens in that game." Smith rubbished the criticism which Kohli has faced time and again in his career over his batting strike-rate saying that no player in the world can read situations as well as the Indian batter. Kohli has been hitting at over 140 in this year's IPL. "Virat is an incredible player. What he does really well, and probably better than most people in the world, is (that) he sums up the conditions and the situation of the game and plays accordingly," he said.

"If he needs to strike big, he does. If he needs to bring it back a little bit and build some partnerships...You don't need 180 on every ground; 150-160 might be enough on some grounds," he added. "Virat sums up the conditions really well and the situation. I'm not fussed about the strike rate," Smith continued.

Smith also touched upon another controversy-mired sub-plot in the IPL -- Hardik Pandya's captaincy of Mumbai Indians and the fan backlash he is facing. He understands why Pandya has been subjected to jeering in all three matches so far, but also wants fans to stop holding on to the past. "Yes and no. Obviously, there was that (booing) going on in the first two games. It sort of becomes a bit of a thing, if that makes sense. But, it was unfortunate, I think. I'd love to see them supporting Hardik. Obviously, there's a lot of huge Rohit fans out there," he said.

"A lot of people are a bit annoyed that he's not the captain of the side. But, everyone needs to let go of that and support Hardik. He's a wonderful player. He had a lot of success at Gujarat (Titans). He's back (as) captain of the side at Mumbai now.

"The senior players need to help him out," Smith said. Being a subject of severe international scrutiny as Australia captain back in 2018 following the ball-tampering incident in Cape Town which led to him being banned for one year, Smith shared some insights on what it takes to come out.

"While all this negativity is out there, he has got to find ways to cope with it and mechanisms to deal with it," Smith said. "Everyone is different (in) the way they do that. For me, personally, I just block everything out. I don't listen to anything; I don't listen to any comments, or boos, or anything like that.

"It's difficult to say, but you kind of just have to let it be. Block it out as much as you can, and just get on with the job at hand. I think the best way for him to turn people around is if Mumbai start winning, that's the key thing," Smith said.

Smith, however, rejected suggestions that the off-field drama has been a factor in MI's three successive losses. "One thing about the Mumbai Indians is (that) they're notoriously bad starters in the tournament. They've done it on numerous occasions," he said. "I don't think they'd be too worried just yet. But, they will have to turn things around really quickly. It doesn't look good, 0-3 at the bottom of the table. They have to turn things around really quickly," he added.

The Royal Challengers Bengaluru will face Rajasthan Royals in their next IPL 2024 match. The match is scheduled to be played on April 6 at the Sawai Mansingh Stadium.

# उष्माघात कक्ष तयार करण्याच्या सूचना !

## मे महिन्यात आणखीन तापमान वाढण्याची शक्यता ■ जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क



■ शहापूर : वाढते तापमान आणि त्यातच संभाव्य उष्माघाताचा धोका लक्षात घेता ठाणे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.खबरदारी म्हणून जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्र आणि ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात उष्माघात कक्ष स्थापन करावेत, असे आदेश आरोग्य सहसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी दिले आहेत. आरोग्य सहसंचालकांच्या आदेशानंतर जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे प्रमुख तसेच सरकारी रुग्णालयांच्या अधिक्षकांना देखील जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

१ मार्च पासून आयएचआयपी एनपीसीसीएचएच या पोर्टलद्वारे सर्वेक्षण करण्यात आले असून एप्रिल व मे महिन्यामध्ये तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आरोग्य केंद्रात स्वतंत्र उष्माघात कक्षाची स्थापना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांना उष्माघात कक्ष कार्यान्वित करून सर्व व्यवस्था सज्ज ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत.हवेशीर खोली, पुरेसा औषधसाठा, कक्षात पंखे, कुलरची सुविधा उपलब्ध करण्यास सांगण्यात आले आहे. उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत चालला असून वाढत्या तापमानामुळे नागरिकांना धोका जाणवू शकतो. विशेषतः वृद्ध जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, दिवसभर उन्हात काम करणारे मजूर, शेतमजूर, रस्त्यावरील विक्रेते यांना उष्माघाताचा धोका जाणवण्याची भीती आहे. उन्हामध्ये फिरायचे असल्यास योग्य काळजी घ्यावी लागते. उन्हाळ्यामधे अनेकजण दुपारी १२ च्या आतच आपली सर्व महत्त्वाची कामे आटोपून घेतात. त्यानंतर दुपारी बाहेर पडत नाहीत. तापमानाच्या निकषांनुसार सलग दोन दिवस डोंगरी भागात ३० डिग्री सेल्सिअस, सपाट भूभागात ४० डिग्री सेल्सियसपेक्षा जास्त तापमानाची नोंद होणे किंवा सलग दोन दिवस हंगामातील सामान्य तापमानापेक्षा ४५ डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाची वाढ होणे यापैकी कोणतीही एक नोंद आढळल्यास भागांमध्ये उष्मघाताची लाट आहे, असे समजून त्यामुळे होणाऱ्या परिणामाला सामोरे जाण्यासाठी दक्ष रहाणे अत्यावश्यक असते. शरीरास घाम सुटणे, तहान लागणे, शरीर शुष्क होणे, चक्कर येणे, उलटी, मळमळ होणे, थकवा येणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे, शरीराचे तापमान वाढणे, तसेच पोटात कळा येणे, शरीरातील पाणी कमी होणे, पाय दुखणे, डोके दुखणे, निरुत्साही वाटणे अशी उष्माघाताची लक्षणे आहेत.

## पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल

■ दिवा : दिव्याच्या साबेगाव येथील कोकणरत्न चाळीत गेल्या दहा दिवसांपासून पाणी न आल्याने तेथील नागरिकांचे हाल झाले आहेत. राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त अक्षय गुडधे यांची भेट घेत लोकांची परिस्थिती सांगितली. याबाबत दिवा प्रभाग समितीकडून लवकरच नागरिकांना पाणी मिळेल,असे आश्वासन देण्यात आले आहे.दिव्यातील साबे गावातील कोकणरत्न चाळी या विभागामध्ये जवळजवळ १० दिवसापासून येथील नागरिकांना पाणीपुरवठा होत नसून पाण्याची गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

## ऑनलाईनच्या गोंधळातही करवसुली

■ अंबरनाथ : गेल्या वर्षभरात ऑनलाईन प्रणालीचा गोंधळ सुरू असल्याने ऑनलाईन बिल भरणा जवळपास ठप्प झाला होता. असे असतानाही ९२ टक्के इतकी विक्रमी कर वसुली करण्यात अंबरनाथ नगर परिषदेला यश आले आहे. त्यामुळे अंबरनाथ नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक होत आहे.

अंबरनाथ नगर परिषदेत पूर्वी एबीएम या कंपनीचे सॉफ्टवेअर वापरून कर वसुली केली जात होती. त्यामुळे या सॉफ्टवेअरच्या आधारावर जलद गतीने कर वसुली सहजरित्या करता येते . मात्र गेल्या वर्षी शासनाने या सॉफ्टवेअरला पर्यायी सॉफ्टवेअर उपलब्ध करून देत सर्व नगरपालिकांना आयडब्ल्यूबीपी हे सॉफ्टवेअर उपलब्ध करून दिले आणि त्याच सॉफ्टवेअरच्या आधारावर कर वसुली करण्याचा सल्ला दिला. मात्र ही नवीन यंत्रणा पूर्ण पणे बंद अवस्थेत होती. तसेच या सॉफ्टवेअरमध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे त्याचा नाहक त्रास अधिकाऱ्यांना आणि सर्वसामान्य नागरिकांना होत होता. मात्र सॉफ्टवेअर चालत नसतानाही अंबरनाथ नगर परिषदेच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी आपल्या कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण केले.

## एमआयडीसीच्या भूखंड दरात आणि हस्तांतर शुल्कात झाली वाढ

### ऐन निवडणुकीत घेतलेल्या निर्णयामुळे नागरिकांमध्ये नाराजी

■ डोंबिवली : महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाच्या प्रीमियम दरात सुधारणा करण्याचे परिपत्रक दिनांक १५ मार्च रोजी एमआयडीसीने काढले आहे औद्योगिक, निवासी, व्यापारी क्षेत्रातील भूखंडाचे दरवाढी बरोबर भूखंड समोरील Road Width charges प्रमाणात ५ टक्के ते १५ टक्के हे अतिरिक्त दर लागू होणार आहेत. विशेष म्हणजे हे परिपत्रक निवडणूक आचार संहिता लागायचा आदल्या दिवशी काढले गेले आहे.या भूखंड दरवाढीचा मोठा फटका डोंबिवली निवासी क्षेत्रातील नागरिकांना बसणार आहे. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये कमालीची नाराजी निर्माण झाली आहे.

यापूर्वीचा डोंबिवली निवासी क्षेत्रातील भूखंडाचा दर हा रू. ३२०६५ /- प्रती चौ. मीटर हा होता आता तो दर रू. ४००९० /- प्रती चौ. मीटर असा झाला आहे. त्यामुळे ही दरवाढ २५ टक्के झाली आहे. वास्तविक डोंबिवली निवासी क्षेत्रात भाडे पट्टयाने विकत देण्यासाठी आता भूखंड शिल्लकच राहिले नाही आहेत .त्यामुळे त्यात वाढ झाली तरी नागरिकांना त्याचे सोयरसुतक नाही. परंतु या नवीन प्रचलित दरामुळे मात्र हस्तांतर, मुदतवाढ, पोटभाडे इत्यादी दरात प्रचंड मोठी वाढ होणार असल्याने निवासी भागातील नागरिक संतप्त झाले असून येथील नागरिकांना आता वाढीव रक्कम यापुढे द्यावी लागणार आहे. आधीच ही हस्तांतर शुल्क रक्कम जास्त होती. त्यात प्रत्येक वेळी सदनिका, बंगलो, व्यापारी गाळे इत्यादी विकतांना एमआयडीसीकडे भरावयाच्या हस्तांतर शुल्कात मोठी वाढ झाल्याने येथील रहिवासी आता एमआयडीसीला वैतागले आहेत. जागा विकताना शासनाला स्टॅम्प ड्युटी/रजिस्ट्रेशन फी ( ६ टक्के +१ टक्के मेट्रो टॅक्स =७ टक्के + १ टक्के रजिस्ट्रेशन चार्जेस + वकील फी ) असे भरावे लागते. शिवाय एमआयडीसी मधील रहिवाशांना अधिक हस्तांतर शुल्क एमआयडीसीकडे भरावे लागते. या हस्तांतर शुल्कावर पण १८ टक्के जीएसटी लावत असल्याने रहिवाशांना त्याचा भूर्दंड सोसावा लागतो. वास्तविक मालमत्ता विकायच्या वेळी रजिस्टर करताना १ टक्के मेट्रो टॅक्स हा मागील दोन वर्षापासून घेतला जात असून ते चुकीचे आहे.

अजून मेट्रोचा पत्ता नसताना ती चालू होण्यास कमीतकमी पाच वर्षाचा कालावधी असताना असा टॅक्स घेणे कितपत योग्य आहे ? असा सवाल आता जनता विचारत आहे. जे भूखंडधारक आपली मालमत्ता भाड्याने देत आहेत, त्यांनाही बसला आहे. डोंबिवली निवासी मधील चार बिल्डिंग परिसरातील भूखंड क्रमांक RH ११९ , १२० , १२१ , १२२ या इमारतींचा भाडे पट्टा हा त्यावेळी ९५ वर्षांच्या ऐवजी फक्त तीस वर्षाचा दिल्याने त्यांचा भाडे पट्टा काही वर्षापूर्वीच संपला होता. त्यांना आता त्याचा मोठा फटका बसणार आहे.

## उष्णतेमुळे उदभवणाऱ्या आजारांची काळजी घ्या!

### महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे आवाहन

■ ठाणे : ठाणे शहर हे खाडी किनारी असल्याने मार्च, एप्रिल, मे, जूनपर्यत वाढणाऱ्या आर्द्रतेमध्ये शरीराला जाणवणाऱ्या उष्णतेत वाढ होते. त्यामुळे नागरिकांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहे. उष्णतेमुळे आरोग्याच्या तक्रारी वाढत आहेत. या आजाराची माहिती नजिकच्या आरोग्य केंद्र, रुग्णालयात दयावी.तसेच उष्णतेच्या लाटेबाबत काळजी घेताना काय करावे, काय करु नये व उष्णतेमुळे होणाऱ्या आजाराबाबत आशा वर्कर्स यांना प्रशिक्षण दयावे. याबाबतची जनजागृती नागरिकांमध्ये करण्याचे आदेश आयुक्त सौरभ राव यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत दिले. त्याचप्रमाणे नागरिकांनी देखील काळजी घ्यावी असे आवाहन आयुक्तानी केले आहे.

उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांबाबत रहिवासी संकुलांमध्ये माहिती पत्रके वाटणे, डिजीटल बोर्डवर सूचना प्रसिद्ध करणे, शैक्षणिक संस्थांमध्ये मुलांना वेळोवळी पाणी पिण्यासाठी सूचना देणे यासारख्या बाबी समाविष्ट कराव्यात. तसेच आशा वर्कर्सच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबाबतच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी या बैठकीत केल्या. तसेच दर १५ दिवसांनी टास्क फोर्सची बैठक घेवून केलेल्या कामाचा आढावा घेण्याबाबतच्या सूचनाही यावेळी संबंधितांना देण्यात आल्या .



ठाणे शहराचा उष्णता उपाययोजना कृती आराखडा तयार करण्यासाठी गठित केलेल्या टास्क फोर्स कमिटीची पहिली बैठक मंगळवार झाली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, प्रशांत रोडे, वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. चेतना नितिल, उपायुक्त अनघा कदम, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान आदी उपस्थित होते.वाढत्या उष्णतेबाबत वागळे इस्टेट प्रभागात झोपडपट्टया व रहिवाशी संकुल येथे सामाजिक, आर्थिक, नैसर्गिक, भौगोलिक सर्वेक्षण करण्यात आले होते. या बैठकीत सेंटर फॉर एन्व्हारमेंट एनर्जी ॲण्ड वॉटर या संस्थेने वागळे इस्टेट येथे केलेल्या सर्व्हेक्षणाबाबत, नागरिकांचे उषणतेच्या लाटेबाबतचे निरीक्षण व त्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली. गेल्या काही वर्षामध्ये उष्णतेच्या लाटेची तीव्रता व वारंवारिता वाढत असून रात्रीचे तापमान देखील वाढत आहे. त्याची झळ दैनंदिन कामकाज करताना समाजाच्या सर्व स्तरावर जाणवत आहे.वागळे इस्टेट प्रभागामध्ये अंदाजे ४० टक्के लोकसंख्या ही १५ वर्षाच्या खाली आणि ६० वर्षाच्या वरील वयाची आहे. त्यांच्यावर उष्णतेच्या लाटेचा परिणाम जास्त तीव्रतेने जाणवत आहे. नजीकच्या आरोग्य केंद्रामध्ये बहुतांशी लोक उपचार घेतात.तसेच आशा वर्कर्स नियमितपणे घरोघरी पाहणी करतात व औषध उपचार देत आहेत, परिसरात ठिकठिकाणी पाणपोईची संख्या वाढविणे, सार्वजनिक वाहतुकीची ठिकाणे जसे बस स्टॅण्ड, रिक्षा स्टॅण्ड या ठिकाणी सावली वाढविणे अशा उपाययोजना नागरिकांनी सुचविल्या असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले.

## भिवंडीत 'एकहाती हंडा एकहाती दांडा' मोर्चा



■ भिवंडी : तीव्र उन्हाच्या झळा वाढू लागल्या असून त्यामुळे शहर व ग्रामीण भागात पाणी टंचाई समस्या गंभीर बनत आहे.भिवंडी तालुक्यातील काही गावात आदिवासी पाड्यांवर पाणी उपलब्ध होत नसल्याने महिला व नागरिकांची मुबलक पाणी मिळवण्यासाठी फरफट होत आहे.याबाबत तक्रारी करून सुध्दा शासकीय यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याने ग्रामस्थ नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून शासन व ठाणे जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी भर उन्हात श्रमजीवी संघटनेच्या कातकरी घटकाचे जिल्हाध्यक्ष जयेंद्र गावित यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ महिलांनी भिवंडी तालुक्यातील मालबीडी सूर्यानगर ग्रामपंचायतीवर एका हाती हंडा एका हाती दांडा या मोर्चाचे आयोजन करून सुरळीत पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी केली.

बहुतांश गावातील योजना आज ही अपूर्ण आहेत.तर अनेक गावातील कामे ठेकेदारांनी अत्यंत हलक्या दर्जाची कुचकामी ठरणारी केली असल्याने या योजनेचा बोजवारा उडाला आहे. भिवंडी तालुक्यातील मालबिडी सुर्यानगर या गावासाठी २०२० मध्ये पाणीपुरवठा योजना मंजूर झाली परंतु तीन वर्षाची मुदत संपून ही गावातील कुटुंबियांना नळाद्वारे पाणी उपलब्ध झाले नसून बोअरवेल मधून सुध्दा उन्हाळयात पाणी येत नसल्याने गावातील कुटुंबिय तहानलेले आहेत, अशी माहिती जयेंद्र गावित यांनी दिली. गावातील योजने अंतर्गत पाणी पाईप लाईन जमीनीवर अवघी एक फूट खोल असल्याने ती कधी ही उखडू शकते त्यामुळे भिवंडी पंचायत समिती पाणीपुरवठा विभाग अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदारांवर कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## दुचाकीच्या धडकेत जेष्ठ नागरिकाचा मृत्यू

■ ठाणे : ठाण्याच्या पाचपाखाडी अल्मेडा रोडवरून पायी जाताना एका जेष्ठ नागरिकास दुचाकीने धडक दिल्याने त्यांचा मृत्यू ओढवला आहे. त्यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या दुचाकीस्वाराविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.जगन्नाथ बाबुराव पाटील (८३) हे ठाण्यातील चंदनवाडी येथे राहतात. ते अल्मेडा मार्गावर फिरत असताना त्यांना एका दुचाकीने जोरदार धडक दिली. त्यांना कौशल्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या अपघात प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात त्यांचे पुत्र माधव जगन्नाथ पाटील (५१) यांनी दुचाकीस्वाराच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## सहाय्यक आयुक्तांचा दिवा स्टेशन परिसराचा दौरा



■ दिवा : दिवा शहरातील वाहतूक कोंडीचे नियमन करण्यासंदर्भात मनसेकडून वाहतूक पोलीस आणि दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांची भेट घेण्यात आली होती. त्यानुसार वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णाजी खराडे आणि सहाय्यक आयुक्त अक्षय गुडदे यांच्या सोबत दिवा स्टेशन परिसराचा पाहणी दौरा करण्यात आला.

दिवा फाटकाजवळ होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सरकत्या जिन्याच्या बाजूने छोटया वाहनांसाठी साबे गावात जायला रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार बाजूच्या रस्त्याचे डांबरीकरण करून घेऊन आज हा मार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला. तसेच स्टेशन परिसरात होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी फेरीवाल्यांवर कारवाई करून रस्ता वाहतुकीस मोकळा करून द्यावा, असे मनसेकडून सांगण्यात आले. मुंब्रादेवी कॉलनी रिक्षा स्टॅण्ड आणि स्टेशन परिसरातील रिक्षा स्टँडला बॅरिकेडिंग करून प्रवाशांना रांगेत रिक्षा उपलब्ध करून देणे व वाहतूक कोंडी करणारे, विनापरवाना गाड्या चालवणारे, स्क्रॅपच्या ( भंगार ) रिक्षांमधून प्रवासी वाहतूक करणारे, बॅच किंवा गणवेश न वापरणाऱ्या रिक्षा चालकांवर कडक कारवाई करण्याची मागणी वाहतूक विभागाकडे त्यावेळी करण्यात आली. यावेळी दिवा मनसेचे शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग अध्यक्ष देवेंद्र भगत, प्रकाश पाटील, शरद पाटील, विभाग सचिव परेश पाटील, शाखाध्यक्ष सागर निकम, रिक्षा युनियनचे अध्यक्ष विनोद भगत, प्रवीण बार्शीकर हे पदाधिकारी आणि पालिका अधिकारी ही पाहणी दौऱ्यात उपस्थित होते.

## टीएमटी बस धडकेत महिला पोलीस जखमी

■ ठाणे : ठाण्याच्या वर्तकनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या दुचाकीला ठाणे महानगर पालिकेच्या बसने धडक दिली. या अपघातात या महिला पोलीस रंजिता सुशील करकेरा (३९) बेशुद्ध झाल्या असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी टीएमटी चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मंगळवारी सकाळी नेहमी प्रमाणे दुचाकीवरून निघालेल्या रंजिता यांच्या दुचाकीला टीएमटी बसने नितीन कंपनी सिग्नलवर धडक दिली. रंजिता करकेरा खाली पडल्याने बेशुद्ध झाल्या. वाहतूक पोलिसांनी त्यांना रिक्षातून लेकसिटी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या डाव्या गुडघ्याला फॅक्चर झाले असून कंबरेला व उजव्या हाताला मुका मार लागला आहे. या प्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात टीएमटीच्या चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## कामगारांची कामे ऑनलाईन पोर्टलने सुरू ठेवा!

### बांधकाम कामगार शिष्टमंडळाचे निवडणूक अधिकाऱ्यांना साकडे

■ भिवंडी : संपूर्ण राज्यांमध्ये आचारसंहिता लागू झाल्यानंतर महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांची कुठल्याही प्रकारची परवानगी न घेताच बांधकाम कामगारांची सर्व कामे बंद ठेवल्याचा आरोप करत आचारसंहिता काळात बांधकाम कामगारांची कामे ऑनलाईन पोर्टलने सुरू ठेवण्यासाठी महाराष्ट्र कामगार संघटनेच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राच्या कामगार विभागाचे उपसचिव दादासाहेब खताळ यांची भेट घेऊन चर्चा करून महाराष्ट्राच्या निवडणूक अधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर केले आहे.

बांधकाम कामगारांची सर्व कामे ऑनलाईनने सुरू ठेवण्यासाठी दोन दिवसांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करणार असल्याचे खताळ यांनी सांगितले.दरम्यान शिष्टमंडळाच्यावतीने बोलताना कॉ.शंकर पुजारी यांनी सांगितले की, राज्यातील २०२२ मधील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या वेळेस मुख्य निवडणूक उपायुक्त यांनी बांधकाम कामगारांचे आचारसंहितेमध्ये ऑनलाइन पोर्टलचे काम बंद ठेवण्याची आवश्यकता नसते.असा निर्णय देऊन सुद्धा स्वतःच्या विवेक कुंभार यांनी सर्व कामे बंद करून राज्यातील ३० लाख बांधकाम कामगारांचे नुकसान केल्याचा आरोप केला आहे.यासह कुंभार यांनी बांधकाम कामगारांची महत्त्वाची कामे बंद ठेवून कंत्राटदारांची भर करणारी कामे सुरू ठेवून आचारसंहितेचे भंग केल्याने त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी.त्याचप्रमाणे विवेक कुंभार यांनी महाराष्ट्रातील पंधरा लाख बांधकाम कामगारांचे अर्ज जाणीवपूर्व प्रलंबित ठेवण्यासह बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मध्यान्ह भोजन योजनेतील अडीच हजार कोटींच्या भ्रष्टाचाराची त्वरित चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी.

तसेच बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर आयएएस अधिकाऱ्याची सचिव म्हणून नेमणूक करावी,अशा विविध मागण्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम यांच्याकडे निवेदनाद्वारे केल्या आहेत. तर बांधकाम कामगारांना न्याय मिळण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयामध्ये सर्व संघटनांच्या वतीने रिट पिटीशन दाखल करण्याचाही निर्णय कृती समितीच्या उपस्थित सदस्यांनी घेतलेला आहे. यावेळी महाराष्ट्रातील विविध बांधकाम कामगार संघटनांचे नेते कॉ.शंकर पुजारी ,सागर तायडे,विनिता बळीकुंद्रे, कॉ.रमेश जाधव, काशिनाथ नकाते,आनंद भालेराव, मनिष गौरखेडे, रवि पवार, तानाजी गायकवाड, सुरज भालेराव आदींचा शिष्टमंडळामध्ये समावेश होता.

## बनावट कागदपत्रांच्या आधारे आरोपींना जामीन मिळवून देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

■ मुंबई : आधार कार्ड, रेशनकार्ड, वेतन पावती, बँक स्टेटमेंट अशी जामिनासाठी लागणारी कागदपत्रे बनावट तयार करून तोतया जामीनदार न्यायालयांमध्ये हजर करत आरोपींना जामीन मिळवून देणाऱ्या टोळीचा गुन्हे शाखेच्या कक्ष ६ ने पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखेने या प्रकरणी अमित गिजे (४४), बंडू कोरडे (४४), अहमद शेख (४४), संजीव गुप्ता (३४) आणि उमेश कावले (४८) या पाच आरोपींना अटक केली असून, त्यांच्या जवळून मोठ्या प्रमाणात बनावट दस्तावेज जप्त केले आहेत.

मुंबईसह ठाणे, नवी मुंबई आणि अन्य जिल्ह्यांतील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल गुन्ह्यातील अटक आरोपींना जामिनासाठी लागणारी आधार कार्ड, रेशनकार्ड, वेतन पावती, बँक स्टेटमेंट अशी वेगवेगळ्या नावांच्या जामीनदारांची बनावट कागदपत्रे मानखुर्दमधील महात्मा फुले नगरात बनवून दिली जातात. लॅपटॉपवर कागदपत्रे तयार केल्यानंतर त्यावर



विविध शासकीय आणि खाजगी कार्यालयांचे बनावट रबरी स्टॅप मारून ही कागदपत्रे तोतया जामीनदाराला देत न्यायालयांसमोर उभे करून आरोपींना जामीन मिळवून दिला जात असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेच्या कक्ष ६ च्या पथकाला मिळाली होती. गुन्हे शाखेच्या कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक रवींद्र साळुंखे यांच्या नेतृत्वातील पथकाने मानखुर्द महात्मा फुले नगरमध्ये छापेमारी करत आरोपी गिजे आणि कोरडे यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी मानखुर्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून गुन्हे शाखेने गिजे आणि कोरडे यांना अटक केली. दोघांची चौकशी आणि तपासातून गुन्हे शाखेच्या पथकांनी छेडानगरमधून शेख, भिवंडीतून गुप्ता आणि कल्याणमधून कावले यांना ताब्यात घेत अटक केली.

आरोपींजवळून वेगवेगळ्या नावांची बनावट आधार कार्ड, रेशनकार्ड, वेगवेगळ्या कंपन्यांची ओळखपत्रे, पॅनकार्ड, महानगरपालिकेच्या कर पावत्या, लॅपटॉप, मल्टिपल प्रिंटर, मिनी लेमिनेटर, एकाच व्यक्तीच्या वेगवेगळ्या नावांनी तयार केलेली आधार कार्ड, पॅनकार्ड, रेशनकार्ड, बँक स्टेमेंट, सॉलव्हनसी, विविध कंपन्यांची ओळखपत्रे अशी बनावट कागदपत्रे हस्तगत केली आहेत.

## मुख्याध्यापकावर गैरवर्तनाचे आरोप

■ कासा :तलासरी तालुक्यातील वरवाडा आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाने गैरवर्तन केल्याची तक्रार येथील विद्यार्थिनी आणि पालकांनी केली आहे. संबंधित मुख्याध्यापकाला डहाणू प्रकल्प अधिकाऱ्याने कारणे दाखवा नोटीस बजावली असून खुलासा मागवला आहे. सत्यता पडताळून कार्यवाही करण्यात येईल, असे आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडून सांगण्यात आले. तलासरी तालुक्यातील वरवाडा आश्रमशाळेतील मुख्याध्यापकाने विद्यार्थिनींसोबत गैरवर्तन केल्याची तक्रार पालक आणि विद्यार्थिनींनी केली आहे. डहाणू आदिवासी विभागाचे प्रकल्प अधिकारी यांनी मुख्याध्यापकाला कारणे दाखवा नोटीस बजावली असून खुलासा देण्यास सांगितले आहे. या घटनेची सखोल चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल, असे प्रकल्प कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, आश्रमशाळेतील १९ विद्यार्थिनींनी मुख्याध्यापकाविरोधात तक्रार केली असून यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.